

चांदवा नसलेली रात
नरेश रावताला
दिव्या प्रकाशन

♦

**चांदवा नसलेली रात/नरेश रावताला**

♦

**प्रकाशक**

प्रेमदास रावताला

**दिव्या प्रकाशन**

६२, कैलासनगर, चितोड रोड, धुळे ४२४ ००१ (महाराष्ट्र)

भ्रमणध्वनी :९२०९९ ७६७१२

**www.divyaprakashan.page.tl**

e-mail : divyaprakashan15@gmail.com

♦

**प्रथमावृत्ती/२०१६**

♦

**अक्षरजुळवणी/मुखपृष्ठ व आतील मांडणी**

दिव्या मुद्रण सेंटर

६२, कैलासनगर, चितोड रोड, धुळे ४२४ ००१ (महाराष्ट्र)

♦

**किंमत**

₹ ५०/-

♦

**मुखपृष्ठासह एकूण पृष्ठे : ५२**

♦

**सौजन्य**

विविध दैनिकांमधून प्रसिद्ध

झालेल्या कथांचा हा संग्रह आहे.

♦ **Chandwa Nasalelee Rat/Naresh Rawatala**

**e-book**

६२, कैलासनगर, चितोड रोड, धुळे ४२४ ००१ (महाराष्ट्र)

भ्रमणध्वनी :९२०९९ ७६७१२

**www.divyaprakashan.page.tl**

e-mail : divyaprakashan15@gmail.com

© पुस्तकातील सर्व हक्क प्रकाशकाकडे राहतील. पुस्तकातील कोणताही भाग प्रकाशकाच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

★ **सूचना :**या कथा संग्रहातील घटना, परिचय, स्थळ, नावे, पात्र काल्पनिक आहेत. यदाकदाचित जोडून आल्यास तो योगायोग समजावा.

या पुस्तकाचे ई वितरण ई साहित्य प्रतिष्ठानतर्फ़े होत आहे.

ई साहित्य ची सर्व पुस्तके दर्जेदार, सहज उपलब्ध असतात आणि अधिकृतपणे विनामूल्य असतात.

या ई पुस्तकांच्या विनामूल्य वितरणाचे अधिकार ई साहित्य प्रतिष्ठानकडे असतात आणि हे अधिकार ई साहित्यतर्फ़े आपल्या वाचकांना दिले जातात. हे पुस्तक भारतात व जगात जास्तीत जास्त मराठी साक्षरांपर्यंत पोहोचावे हा उद्देश आहे.

मात्र या पुस्तकाच्या पुनर्मुद्रणाचे वा अंशतः मुद्रणाचे, नाट्य वा चित्रपट रुपांतराचे, किंवा इतर कोणत्याही रुपात आणण्याचे सर्व अधिकार लेखकाकडेच असून त्याचे उल्लंघन करणाऱ्यावर कायदेशीर कारवाई होऊ शकते.

ई साहित्य प्रतिष्ठान

# ई साहित्य प्रतिष्ठान

इंग्लंडची लोकसंख्या सहा कोटी आहे. आणि महाराष्ट्राची बारा कोटी. इंग्लीश वाचकांची संख्या आहे शंभर कोटी. आणि मराठी वाचक? कुठे आहोत आपण. माझा मराठाची बोलु कवतुके... अमृतातेही पैजा जिंके.... माउलींनी दाखवलेलं स्वप्न पूर्ण करू तरच आम्ही शिवबाचे मावळे.

मराठी पुस्तक वाचायला कुठे जायची गरज नाही. तुमच्या मोबाईलवर आता हजार मराठी ई पुस्तके आहेत.

मराठी ई पुस्तकं तुम्ही www. esahity. com वरून डाऊनलोड करा. किंवा

esahity@gmail.com ला कळवून मेल ने मिळवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून या नंबर ला तुमचे नांव व गांव Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www.

esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. ते download करा. हे सर्व मोफ़त आहे. No terms. No Conditions.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईलमध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

आपले नम्र

टीम ई साहित्य

# बदलत्या पिढीला समर्पित...

प्रत्येक माणूस आपापल्या दु:खाने पिचला आहे. प्रत्येकाच्या मनात स्वत:च्या अशा जपलेल्या खास जखमा आहेत. अनाकलनीय दु:खाची संवेदनशील मनाला जबरदस्त ओढ असते. आपल्या आठवणींचे अवशेष आपले मन सतत साठवित असते. श्वासाश्वासाच्या बदल्यात इथे दु:ख माणसाला चिकटत असताना माणूस मरणाला का घाबरतो? प्रत्येकाच्या मनात कैक सवाल असतात; मात्र त्यांचे जवाब मिळत नाहीत. म्हणून तलाश जारी राहतो त्या चाकोरीतच माणूस जगत राहतो. ज्या दिवशी हा तलाश संपतो- 'द मॅन इज डेड'. म्हणून, म्हणूनच झपाट्याने बदलणाऱ्या पिढीला 'चांदवा नसलेली रात' स्व. एम. जे. रावताला ऊर्फ स्व. म. ज. रोहिणीकर यांच्या पावन स्मृतीप्रित्यर्थ बदलत्या युवापिढीतल्या वाचकांना समर्पित करतो आहे.

– नरेश रावताला

# आतल्या पानांवर...


| | |
|---|---|
| १. चांदवा नसलेली रात | ७. |
| २. अर्ध्यावरती डाव मोडला! | १९. |
| ३. तिसरीही पोरच झाली हो...! | २२. |
| ४. एक निराळी कथा | २६. |
| ५. ठेवलेला रिश्ता | २९. |
| ६. अशाच एका पावसराती | ३२. |
| ७. निरपराधी | ३५. |
| ८. पावसात भिजलेली संध्या | ३८. |
| ९. प्रेमातून स्पर्शाकडे | ४१. |
| १०. अरुणाचा करूण अंत... | ४३. |
| लेखकाचा परिचय | ५१. |

# चंद्र नसण्याचा मतितार्थ

नरेश रावताला यांचा हा नव्वदीच्या काळात लिहिलेला लघुकथा संग्रह वाचनीय आहे. आजच्या तरूण पिढीला शोभणारा असला तरी त्यामधील गाभा भविष्यातही तसाच असणारा आहे. तेव्हाच्या आणि आताच्या दुनियादारीत फरक जरूर आहे. मात्र, बदलत्या इथल्या जमान्यात काहीतरी परिवर्तन खचितच हवे! नव्वदीतला काळ आणि आता झालेला बदल याला अनुसरून 'चांदवा नसलेली रात' ही कथा परावर्तीत करण्यात आली आहे. या पुस्तकाला जे नाव देण्यात आले आहे, ते एकप्रकारे निराळे वाटावे. पण, महाविद्यालयीन जीवनात अनाकलनीय झालेले आकर्षण आणि त्याद्वारे निर्मित अनामिक प्रेम जिवाची काहीली करणारे आहे. महाराष्ट्रातील मागास म्हणून ओळख असलेल्या धुळे जिल्ह्यातील विविध दैनिकांमधून प्रसिद्ध कथांचा हा संग्रह काल्पनिक जरी असला तरी तरूणवर्गासाठी वाचनीय आहे. हाच चंद्र नसण्याचा मतितार्थ समजावा. कल्पना किती महत्वाची असते? हे सांगितले तर आपण त्यात मग्न व्हाल. म्हणून, म्हणूनच 'चांदवा नसलेली रात' वाचायलाच हवी, नव्हे जपून ठेवायला हवी. शेवटची लघुकथा हा लघुकथासंग्रह समाप्त करताना २० मे २०१५ रोजी 'अरूणाचा करून अंत...' या नावाने लेखवजा माहितीस्वरूपात लिहण्यात आली आहे. या लघुकथेतील पात्र, घटना, स्थळ आणि नावे काल्पनिक असू शकतील, ही अपेक्षा. कारण, 'अरूणाचा करून अंत...' झाला असला तरी पुढे तिची कादंबरी होऊन एखाद्या सिनेमाची निर्मिती होऊ शकते.

–मनोज गर्दे

(मुख्य संपादक :सांजदैनिक 'खान्देश मैदान', धुळे)

# १. चांदवा नसलेली रात

सायंकाळचे साडेचार वाजले होते. बेमोसमी पावसाची रिपरिप थांबायला राजी नव्हती. झिमझिमत्या सरींकडे टक लावून संध्या कुठल्यातरी विचारतंद्रीत सकाळपासून व्हरांड्यावरच बसून होती. पहाट जशी दिवसासाठी जागी व्हावी, तशी ती आताशी दुपारच्या जेवणासाठी भानावर आली. अधुऱ्या मंजुषेच्या बुचकळ्यात जिनाच्या पायऱ्या तुडवताना तिच्या पायाला अचानक ठेच लागली.

ती मनाशीच पुटपुटली, '' चालताना पायाला ठेच लागते; पण मनाला खोल वेदना होतात. त्यावर मलमपट्टीसुद्धा करता येत नाही. बुजू पाहणाऱ्या जखमेवरील पापुद्री कुठल्याही क्षणी पुन्हा उघडी पडते. त्यातून वाहणारे रक्त पाहून वाटते, आणखी किती काळ हा जाच सहन करायचा! कधी थांबणार ही वेदना?''

मित्र-मैत्रिणींच्या गर्दीत वावरणाऱ्या संध्याने 'प्रेमभंग' झाल्यानंतर महाविद्यालयीन शिक्षणाला अर्धविराम दिला होता. प्रेमभंगाला सामोरे जाताना ती मनाने पार खचून गेली होती. मोबाईल, व्हॉटस्‌ॲप एव्हाना फेसबुकचा वापर करणेदेखील टाळले होते. जवळच्या मित्रांचे आणि मैत्रिणींचे फोन उचलायची तसदीही ती घेत नव्हती. खरे तर, मोबाईलवर बोलणेच जणूकाही तिने टाळले होते. 'सिमेंट-काँक्रिटच्या जंगलात घराच्या चार भिंतीआड जगणे', असे आयुष्य तिचे अलिकडचे झाले होते. फार-फार पहिल्या मजल्यावरील गॅलरीत एकलकोंडी राहणेच तिने पसंत केले होते. त्यामागचे कारणसुद्धा तसेच होते.

महाविद्यालयीन जीवनात संध्याने मित्रांचा मोठा गोतावळा तयार केला होता. संपूर्ण महाविद्यालयात ती अनेकांची चाहती बनली होती. दिसायला पुरती सुंदर-देखणी. पाणीदार डोळे, चमकदार नजर, सशक्त बांधा. कपाळावर पुढे आलेली

केसांची बट. चालताना किंचित डावीकडे झुकणारी मान. मनमोकळा स्वभाव, कोणत्याही तरूणाला भावेल असे तिचे संभाषण कौशल्य. तिच्या मुक्त वागण्यावर महाविद्यालयातील अनेक तरूण फिदा व्हायचे. गेल्या चार वर्षांत संध्याने कैक वार्षिक स्नेहसंमेलने गाजवली होती. महाविद्यालयात होणाऱ्या निरनिराळ्या विषयांवरील परिसंवादात, कार्यशाळेत आणि कार्यक्रमांमध्ये ती सतत आवर्जून सहभागी होत असे. बी. एस्सी.च्या द्वितीय वर्षाला असताना तिचे साजनशी अनामिक प्रेम जुळून आले.

ग्रामीण भागातून शहरात आलेला साजन त्याच महाविद्यालयात विज्ञान शाखेत अखेरच्या वर्षाचे शिक्षण घेत होता. शिक्षणासाठी शासकीय वसतिगृहात त्याचा निवारा होता. कौटुंबिक स्थिती मध्यम असल्यामुळे तो रोज वसतिगृहातून महाविद्यालयात सायकलीने ये-जा करायचा. तसा तोही हुशार, सोज्वळ, प्रामाणिक, सभ्य-सुसंस्कृत. मात्र, कुणाशीही फार कमी बोलणारा. अभ्यासाकडेच त्याचे नित्य लक्ष असायचे. घेतलेल्या विषयांच्या तासांना वेळेवर हजर राहणे, त्याने आद्यकर्तव्य मानले होते. प्रयोगशाळेतील प्रात्यक्षिक संपले की आपला मोबाईल बंद करून एकटाच जवळच्या बागेत जाऊन अभ्यासात मग्न होत असे. मधल्या सुटीत कॅन्टीनमध्ये काही मोजक्या मित्रांबरोबर चहा घेतल्यावर पुन्हा बागेत जाऊन अभ्यासाला लागायचा. सोमवार ते शनिवार जवळपास असेच त्याचे महाविद्यालयातील आठवड्याचे नियोजन असे. महाविद्यालयात होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये त्याला अजिबात रुची नव्हती. मारामाऱ्यांचा त्याला मनस्वी तिटकारा होता. मित्रांच्या उपद्व्यापांपासून तो सतत अलिप्त असायचा. त्यांच्या गर्दीत वावरायलाही त्याला सहजासहजी पटत नसे. म्हणून त्याच्या काही जिवलग दोस्तांनी त्याचे नाव 'अबोल' ठेवले होते. कधी तर गमतीने 'मुका' अशी साजनला हाकाटी मारली जायची. परंतु, अशा बाबींकडे तो फारसा गांभीर्याने लक्ष देत नसायचा की मनावरही घेत नसायचा. मित्रांनी केलेली टिंगलटवाळी, गंमत-जंमत त्याला आवडत नसे. अभ्यासाच्या चाकोरीत गुरफटलेला साजन गेल्या दोन वर्षांपासून महाविद्यालयात विज्ञान शाखेत अव्वल ठरलेला. पदवीच्या अखेरच्या वर्षी अभ्यासात आणखी भर देऊन विद्यापीठाच्या गुणवत्तेत येण्याचा त्याचा निश्चय. म्हणूनच 'अभ्यास' हेच त्याचे समिकरण होऊन बसले होते. त्यामुळे फालतू गोष्टींकडे त्याने साफ दुर्लक्ष केले होते.

त्या दिवशी सकाळी कॉलेजला जाताना साजनला वसतिगृहातूनच उशीर झाला होता. वेळापत्रकानुसार पहिला तास त्याला होता. लगबगीने तो सायकलीवरून निघाला असताना रस्त्यातच आणखी एक गडबड झाली. सायकलीचे मागील टायर

अचानक पंक्चर झाले. सकाळची वेळ असल्याने दुरूस्तीचे मार्टही अद्याप उघडले नव्हते.

'आधीच उशीर झालेला आणि त्यात आणखी भर पडली ती टायर पंक्चरची...' साजन बुचकळ्यात पडला. तरीही त्याने सायकल लोटत चालण्याचा वेग वाढवला. घाई-घाईने कसाबसा तो महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारापर्यंत पोहचला. तेवढ्यात मागून भरधाव वेगावे आलेल्या स्कुटी दुचाकीवरील एका तरुणीचा तोल गेला आणि ती स्कुटीचालक साजनला धडक देऊन घसरली. पहिला तास सापडावा म्हणून वसतिगृहातून धांदलीत निघालेल्या साजनवर या अपघातामुळे आणखी एक मुसिबत कोसळली. स्कुटीच्या धडकेने त्याच्या हाता-पायाला खरचटले होते. लोटत आणलेली टायर पंक्चर सायकल धडकेमुळे त्याच्या हातातून सुटली होती. 'विलंबात संकट आणि संकटात विघ्न!' अशी त्याची दशा झाली होती. तरीही घडलेल्या प्रकाराकडे त्याने फारसे गांभीर्याने लक्ष दिले नाही. धडक देऊन घसरून पडलेल्या स्कुटीचालक तरुणीच्या चुकीची, तिला कुठे लागले किंवा दुचाकीचे कोणते नुकसान झाले, याविषयी साजनला अजिबात फिकर नव्हती. त्याला काळजी होती ती आजचा पहिला तास चुकल्याची. त्याने जमिनीवर पडलेली सायकल उचलली. दप्तर झटकून पुन्हा पाठीवर लटकवले. हात-पाय झटकले. खिशातून रुमाल काढून खरचटलेल्या ठिकाणी हळूवार हात फिरवला आणि महाविद्यालयाच्या परिसरात असलेल्या वाहनतळात जाऊन सायकल लावली. पहिला तास तसा त्याचा अर्धा बुडालाच होता. त्यानंतर मधल्या सुटीच्याआधी अन्य विषयाचा तिसरा तास होता.

तिकडे, महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराशेजारी एका अशोक झाडाला आदळून स्कुटीचालक तरुणी घायाळ झाली होती. तिच्या कपाळाला किरकोळ जखम झाली होती. डाव्या हाताचा अंगठा किंचितसा मुरगळला होता. गालावर खरचटले होते आणि उजव्या गुडघ्याला मुका मार लागला होता. पंजाबीचा तिचा दुपट्टा स्कुटीत अडकून जरासा फाटला होता. दप्तर इतस्तत: विखुरले होते. 'जागेवरुन कुणी सावरायला येईल', अशी तिची अपेक्षा होती; मात्र पहिला तास सुरू झाल्यामुळे प्रवेशद्वाराच्या आसपास शांतता होती. घडलेला प्रसंग आकस्मिक आणि अनपेक्षित होता.

घरून निघताना संध्याला आज थोडासा विलंब झाला होता. मोबाइलची बॅटरी उतरल्याने पहाटेचा अलार्म झोपला होता. त्यामुळे तिला वेळेवर जाग आली नव्हती. ती जागी झाली तेव्हा सकाळचे सहा चाळीस झाले होते. तिच्या मैत्रिणी तिची वाट पाहून कॉलेजला निघून आल्या होत्या. तिने लगबगीने सकाळप्रहरीचा दैनंदिन कार्यक्रम आवरला होता आणि तशीच ती आपल्या नेहमीच्या स्कुटीवरुन

घाईने महाविद्यालयाला निघाली होती. संध्यालाही आज पहिला तास सक्तीचा होता. पण...

स्वत:ला सावरत, अशोक झाडाचा सहारा घेत ती जमिनीवरुन कशीबशी उठली. स्कुटीच्या दोन्ही आरशांना तडे गेले होते. पुढचे मडगर वाकडे झाले होते आणि लाईट फुटला होता. स्कुटीत अडकून फाटलेला दुपट्टा तिने ओढून काढला. विखुरलेले दप्तर एकत्र करून झटकले. कपाळाला रुमाल गुंडाळला. वहीतील एक कागद फाडून तुकडा चेहऱ्यावर गिरवला. लंगडत-लंगडत तिने स्कुटी उभी केली आणि झाडाला टेकून थोडावेळ आडोसा घेतला. घडलेल्या घटनेला घाई कारणीभूत होती. जे घडले होते ते नकळतपणे. पण, धडक बसलेल्या तरूणाने तमा न बाळगल्याची संध्याला कीव आली. त्याची आणि तिची फारशी ओळख नव्हती. परंतु, तो आपल्या कॉलेजमधील असल्याचे संध्या जाणून होती. चूक आपली असूनसुद्धा 'सॉरी' म्हणण्याची साधी तसदी न घेतल्याचे शल्य तिच्या मनात बोचत सुटले. 'स्कुटीचा ब्रेक वेळीच लागला असता तर कदाचित हा प्रसंग टळला असता', असे तिला आपसूकच वाटू लागले.

घडलेली घटना अनावधानाने घडून गेली होती. घटनेला तो, ती आणि त्यावेळचे भोवतालचे वातावरण साक्षीदार होते. स्कुटीच्या नुकसानीची संध्याला चिंता नव्हती की तिला लागलेला मार त्रासदायक नव्हता. एखाद्याला आपण अनाहूत धडक द्यावी... ''हीच घटना हमरस्त्यावर, वर्दळीच्या ठिकाणी घडली असती तर काय झाले असते? धडक बसलेला माथेफिरू राहिला असता तर?'' संध्याच्या मनात आता 'तर'चे भूत घर करीत होते. वेगवेगळ्या विचारांनी काहूर माजवायला सुरूवात केली होती. ती हर-तऱ्हेच्या तर्क-वितर्कांत बुडाली होती. नाना कल्पना, विविध प्रश्नांनी गोंधळ घातला होता. सर्पाची जीर्ण कात गळून जावी त्याप्रमाणे तिच्या मनातील धीर गळून पडला होता. मैत्रिणी, घरच्या मंडळींकडील प्रश्नांच्या सरबत्तीपुढे सामोरे जायला तिच्यात ताकद उरली नव्हती. पहिला तास संपल्याची घंटा वाजली, तशी संध्या भानावर आली. दुसऱ्या तासाला वर्गात जाण्यास तिने टाळले. अशोक वृक्षाच्या आडोशातून तिने काढता पाय घेतला. स्कुटी ढकलत हळूच महाविद्यालयाचे आवार सोडले. फर्लांगाच्या अंतरावर असलेल्या गॅरेजपुढे तिने स्कुटी लावली.

गॅरेजवाला सकाळपुजेला लागला होता. कपाळाला गुंडाळलेला रुमाल सोडून संध्याने चेहऱ्यावरील घाम टिपला. मुका मार लागलेला गुडघा हलकेच झटकला. मुरगळलेला अंगठा उजव्या हाताने थोडासा ताणला. तशी गॅरेजवाल्याची पुजापात्री आटोपली. त्याने स्कुटीची दशा पाहिली. दुरूस्तीचा खर्च सांगून संध्याला तासाभरात

येण्याचे सांगितले. स्कुटीची किल्ली गॅरेजवाल्यास देऊन ती डॉक्टरकडे जाण्यास निघाली तोच साजन आपली टायर पंक्चर सायकल घेऊन गॅरेजवर पोहचला. संध्या आणि त्याची नजरानजर झाली. महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावर अर्ध्या तासापूर्वी काय घडले होते, हे दोघेही जाणून होते. स्कुटीची दुर्दशा आणि संध्याची दशा बघून साजन भाऊक झाला. 'बोलावे तर काय, न बोलावे तर काय...' असा विचार त्याच्या मनाला क्षणार्धात शिवून गेला. अर्धवट सापडलेला पहिला तास पूर्ण करून तो टायरचे पंक्चर काढण्याच्या उद्देशाने गॅरेजवर आला होता. संध्या-साजन परस्परांकडे बघत 'मूक' नक्कीच बनले होते. पण, दोघांच्या डोक्यात चाललेले विचारांचे विंचवे 'बधीर' नव्हते! नदीने समुद्राशी भांडायला यावे आणि शेवटी त्याच्या स्वरूपात मिळून जावे, असे हे सारे झाले होते. जिथे आग लागण्याचा संभव आहे त्या दिशेशी संबंधच नको, असे साजनला वाटत होते, तर संध्याला साजनविषयी जाणून घ्यायची अभ्यंतरातून इच्छा झाली होती. मात्र, एखाद्या झाडाच्या बुंध्याशी ससा अंग चोरून गच्च बसावा तसे सारे वातावरण जणू अंग चोरून बसले होते. खऱ्याअर्थाने इथूनच अगदी जवळून दोघांची प्रत्यक्ष ओळख झाली होती.

'प्रेमभंग' पावलेल्या संध्याची स्थिती आज निराळी झाली होती. प्रेम माणसाला जगायला शिकवते, तसे तडपायलाही भाग पाडते. खरेच, किती निराळी ही नशिबाची गुंतागुंत? छोट्याशा आयुष्यात देव कोणती परीक्षा घेईल, याचा नेमच उरला नव्हता. सुख-दु:खाचे कंगोरे पडद्याआडून कूस बदलत होते. एखाद्या वैफल्यग्रस्ताभोवती चोहोबाजूंनी संकटे उभी ठाकावित तसल्या कैक उदास आठवणींशी संध्या मुकाबला करीत होती. नशिबाला साथ न दिलेल्या हातावरल्या रेषांना दोष देत ती चार भिंतींआड आपल्या जखमा कुरवाळत बसली होती. भूतकाळात घडलेले प्रसंग आठवायला लागले की, त्या वासाने तिच्या व्यथा उफाळून येत असे. एकूण जीवनातले शल्यच तिला ग्रासून टाकले होते, विदीर्ण करून टाकले होते. देवाच्या या दुनियेत दु:खाची कमतरता नसल्याचा भास तिला वारंवार व्हायचा. ''प्रत्येक माणूस आपापल्या दु:खात पिचला आहे. प्रत्येकाच्या मनात स्वत:च्या अशा जपलेल्या खास जखमा आहेत'', असे तिला राहून-राहून वाटायचे. ती अंतर्मनातील तिचे दु:ख कुणाला सांगू शकत नव्हती अगर वर्तमानात भेडसावणारा भूतकाळ स्पष्टपणे मांडूही शकत नव्हती. कारण, भावनिक होऊन जिंदगी कंठण्यातच ती स्वत:चे समाधान मानत होती.

गतकाळाच्या विचारचक्रात गुरफटलेल्या संध्याने आताशी कसेबसे दुपारचे जेवण आटोपले. बितलेल्या काळातल्या आठवणी गोंजारत ती साजनच्या दुराव्याने

पार खचून गेली होती. राहून-राहून तिला आठवणी सतावत होत्या. घरकाम करणाऱ्या सयाने घरातले सारे काम आवरले होते. दारे-खिडक्या, बैठक खोलीतले दिवे बंद करून तीदेखील आपल्या खोलीत निजायला गेली होती. जाताना तिने संध्याला झोपी जायला सांगितले होते. संध्याचे आई-वडील कुठल्यातरी कामाच्या निमित्ताने दोन दिवसांपासून नातेवाईकांकडे परगावी गेले होते. त्यामुळे घरातले शांततेचे वातावरणे जणूकाही संध्याला खायला उठले होते. साजनच्या आठवणींच्या माध्यमातून ती अक्षरश: कावरी-बावरी झाली होती. आपल्या शयनगृहाचा दरवाजा बंद करून तिने स्वत:ला आरामखुर्चीत झोकून दिले. भिंतीवरील घड्याळाकडे तिचे लक्ष गेले. रात्रीचे आठ वाजत आले होते. काहीवेळाने खुर्चीवरून उठून ती पलंगावर जाऊन पडली. डोक्याखाली उशी घेत शांत राहण्याचे तिने ठरविले; पण आठवणींचे वादळ शमायला राजी नव्हते!

करवटे बदलता-बदलता ती मनाशीच पुटपुटली, ''मन अस्वस्थ असेल तर झोपसुद्धा माणसाला पारखी होते. ज्यास आपण नको म्हणून दूर लोटतो, तेच विचार लोचटासारखे लपेटून सतावतात...''

तिने पलंगावरून उठून खिडकी उघडली. पावसाची रिपरिप अजून सुरूच होती. रातकिड्यांची किर्रकिर्र फुगडी खेळत होती. हमरस्त्यावरील पथदिव्यांच्या उजेळाला शिरशिरत्या बरसातीचे पिटूकले थेंब छेदून जात होते. अधूनमधून जाणाऱ्या वाहनांकडे ती खिडकीच्या गवाक्षातून टक लावून बसली होती. वातावरणातला गारवा तिला झोंबत होता. आभाळ गच्चून भरले होते. बेमोसमी पावसझडी थांबायला तयार नव्हती. झोंबणाऱ्या गारव्याने शिरशिरी आल्याने संध्याने खिडकी बंद करत पडदा ओढला. खोलीतला रात्रदिवा चालू ठेऊन ती पुन्हा पलंगावर लवंडली. डोळे मिटले, विचारशून्य मनाने शरीराला ढिले सोडले, दोन-चारदा कूस बदलली. पण, घड्याळाची टिक्टिक तिला भयदायक वाटू लागली. त्या आवाजाने झोप काही लागेना. भूतकाळातल्या स्मृती पुन्हा जाग्या होऊ लागल्या. ती पुन्हा साजनच्या आठवणींमध्ये रमली... त्या आठवणींना मोगऱ्याचा सुगंध होता आणि चंदनाचा गंध होता.

घड्याळाकडे पाहताना तिच्या मनात विचार आला, ''घड्याळाचे काटे पुढेपुढे सरकताहेत कधी मागे न फिरण्यासाठी! मग, माझे मन हे असे का गतकाळात फिरतेय्...? घुटमळतेय...?'' अपेक्षा नसतानासुद्धा साऱ्या घटना तिच्या मन:श्चक्षूपुढे झिम्मा खेळत होत्या. एकेक स्मृती अंत:करणाला डंख करू लागल्या...

साजन विज्ञान शाखेच्या अखेरच्या वर्षाला असताना त्याच्या प्रामाणिकपणावर संध्या फिदा झाली होती. त्याच्या अभ्यासूवृत्तीत आकंठ बुडाली होती. विज्ञान

विषयाबाबत आलेल्या अडचणींच्या निराकरणार्थ ती साजनला नेहमीच त्रास देत असे. गृहपाठाचे टाचण, प्रात्यक्षिकची न समजलेली माहिती जाणून घेण्यासाठी वारंवार साजनच्या संपर्कात असायची. तोदेखील तद्संबंधीचा सल्ला देण्यात कमीपणा मानत नसायचा. सततच्या संपर्कातूनच दोघांमध्ये नकळतपणे प्रेम जुळून आले होते. सदोदीतच्या भेटण्यातून अंकुर फुलला होता. हे अनामिक प्रेम अंत:करणापावेतो जाऊन भिडले होते. त्यामुळे दिवसेंदिवस जवळीक वाढली होती आणि जिव्हाळा बहरत गेला होता. दोघांचे तारुण्य सत्यार्थाने आल्हाददायक बनले होते. जीवनात निराळी उभारी आली होती. आसमंत निरभ्र दिसू लागले होते. पाण्याची चव बदलली होती, काळाची गती समजली होती. स्पर्शामधली भावनिकता कळली होती... कुठेतरी जळणारी पण सौख्याची वात दरवळून टाकणारी. स्मरणाचा झरा झिरपत होता; आता ती त्यातीलच एक भाग बनून गेली होती मनात कायमची अस्वस्थता वाहती ठेऊन. रेशमाच्या मुलायम गाठी एकदा पडल्या की त्या कधी सुटत नाहीत, सोडण्याचा प्रयत्न केला तर तुटतात! तुटल्या तर मनात खोलवर जखम होते, भरून न निघणारी.

घड्याळातून ट्णटणणाऱ्या बाराच्या ठोक्यांनी संध्या विचारतंद्रातून जागी झाली. कितीतरी वेळ ती सून्न मनाने पलंगावर बसून होती. मनात खळबळ असतानाही चेहरा शांत ठेवायला ती शिकली होती. बाजूच्या टेबलावरून तिने अर्धाग्लास पाणी घेतले. दीर्घ श्वास घेत सुस्कारा सोडला; मात्र अस्वस्थतेची रटाळ पिछा सोडायला तयार नव्हती. क्षणार्धात तिचे मन सैरभैर झाले. खिडकी उघडली. सकाळपासून बरसणारी पावसाची रिपरिप थांबली होती. आभाळदेखील निरभ्र झाले होते. मध्यरात्रीच्या त्या प्रहरी धरित्रीवर काळोखाने साम्राज्य पसरविले होते. चांदण्यांनी डोळे मिचकायला सुरूवात केली होती. पाऊस थांबल्याने बेडकांचे डरकावणे सुरू झाले होते. डबक्यात साचलेल्या पाण्यात आसमंताचे प्रतिबिंब उल्हासात पोहत होते. माणसांची कुजबूज संपलेली होती, आसपासचे जग निरव झोपेत गेले होते. वाहनांचा गोंगाट नव्हता. कितीतरी वेळ संध्या उघड्या खिडकीजवळ थबकून होती आपल्याच नादात. मग, अचानक हसण्याच्या आवाजाने दचकून गेली. तिने रस्त्याकडे नजर टाकली. दोन सावल्या एकरुप होऊन रस्त्यावरील डबक्यात साचलेले पाणी उडवत चालल्या होत्या. संध्याला साजनचा तेव्हाचा सहवास आठवला...

तीन महिने लोटले त्या प्रसंगाला! बाहुपाशात लपेटलेले दोन देह... आता तिच्या डोळ्यासमोरून स्पष्टपणे तरळू लागले. सभोवारच्या गर्द झाडी... निर्मनुष्य इलाखा आणि अबोल एकांत उभा राहिला. त्यावेळी तिच्या कानात घुमलेले शब्द, ''संध्या हे काय केले आपण...? आता तू तरी रुसू नको माझ्याशी... अशीच जवळ

राहा कायमची!'' आणि एकदा उजव्या खांद्यावर डोके ठेऊन ती स्फुंदून-स्फुंदून रडू लागली. परंतु, अंदाज आटोपले होते, खेळ आवरला होता भावनांचा. शंकाकुशंका, धास्ती-धडपड सारेकाही संपले होते. प्रितीच्या भव्यभावनेचा आकस्मिकपणे साक्षात्कार झाला होता. रतीच्या उंबरठ्यावर, आतुरतेच्या अवसानावर अनुभवलेले तुटपुंजे सहजीवन अनोख्याच दुनियेत प्रवेश करून गेले होते. हलकेच सारे झिरपून गेले होते... तो सायंकाळचा सुवास, पाचोळ्याची ती सळसळ, मिटलेल्या पापण्या सर्व मूक झाले होते. फक्त शब्द कानठळ्यांवर वारंवार आदळत होते ते, ''संध्या हे काय केले आपण...? आता तू तरी रुसू नको माझ्याशी... अशीच जवळ राहा कायमची!'' अशा नटखट स्मृतींच्या प्रसंगांची याद यायची आणि मग संध्या त्या स्मृतीत दंग व्हायची. तेव्हा झालेले संवाद, लाडीक रुसवा, खोटे नकार, तो एकांत सारेसारे...

आठवणींच्या चक्रव्युहात अडकलेली संध्या पार गळून पडली होती. अधून-मधून उदरात होणाऱ्या हालचालींनी तिला पुरते बैचेन केले होते. संध्याला पुन्हा हळूच जाणीव झाली आणि हुंदके देत ती रडू लागली. साजनला भेटण्याचा अनेकदा तिने प्रयत्न केला होता. मात्र, त्याने तिचे भेटणे टाळले होते. मोबाइलद्वारे संभाषण करण्याची संधीदेखील साजनने दिली नव्हती. त्यामागचे कारणही तसेच होते. साजन आई-बापांची नातेवाईकांमध्ये मान झुकली जाण्याची भीती बाळगून होता. घरच्या मंडळींना कळू न देता संध्याच्या प्रेमाची त्याने चोरी केली होती. त्याविषयी कल्पना देण्याचे धाडस त्याच्यात नव्हते. तो धास्तावला होता. त्याला जी काळजी सतावत होती ती फक्त नकळतपणे घडलेल्या प्रसंगाची.

संध्या समाजात होणाऱ्या बदनामीला घाबरली होती. घडलेला प्रसंग दोन्ही घराण्यांना बिरादरीत अपमानास्पद आणि धक्कादायक होता. किनाऱ्यावर येऊ पाहणारी नौका अचानक आलेल्या देहस्पर्शी वादळाने भरकटली होती. दोघांमध्ये दुराव्याची दरी जरूर निर्माण झाली होती. मात्र, भयापोटी प्रेमावर पाणी फिरवण्याचा त्यांचा फैसला थोडासा चुकला होता. प्रेमात आकंठ बुडालेल्या दोघांचा बाहुपाश अनपेक्षित वावटळ उभे करेल, याची संध्या-साजनला तेव्हा पुसटशीही शुद्धी राहिली नव्हती. प्रेमाचा पाश, अलौकीक झालेल आकर्षण, उदरातला अंकुर आणि बदनामीची भीती यातून पुढचा मार्ग शोधताना जहरीले नाग चहूकडून संध्याच्या काळजावर डंख मारत होते. मुख्यत: याच कारणामुळे तिने महाविद्यालयीन शिक्षणाला अर्धविराम दिला होता. पण, घरच्या मंडळींना संध्याची सच्चाई पुरेशी कळलेली नव्हती. विवाहासाठी स्थळ शोधणे सुरू असतानासुद्धा संध्याने पुढील शिक्षणाचा आग्रह धरला होता. 'शिक्षण वाया जात नाही', हा हेका तिचा कायमचा होता. तिच्याच इच्छेनुसार

महाविद्यालयीन शिक्षणाला आई-वडिलांनी संमती दिली होती.

रात्रभरापासून आपल्याच विचारतंद्रीत खिडकीजवळ थबकलेल्या संध्याने शरीराला ढिल देत दीर्घ नि:श्वास सोडला. रात्रीचा गडदपणा आता हळूहळू वितळ चालला होता. पूर्वेकडे दिसणाऱ्या काही ठळक चांदण्यांची फळी सरकत-सरकत पश्चिमेकडे झुकत होती. त्यातील बऱ्याच चांदण्या लुप्त होण्याच्या मार्गावर होत्या. काही ठराविक तेव्हढ्या उरल्या होत्या. काही वेळाने शुक्राची चांदणी उगवली आणि पूर्वेच्या क्षितिजाच्या वरची आकाशावरची पट्टी काळपट गुलाबी दिसू लागली. भोवळ येऊन गेल्यावर हळूहळू परिचित वस्तू पुन्हा दिसू लागाव्यात तशा चोहोदिशा ओळखीच्या टप्प्यात आल्या. अंधारात दडलेला आठवणीचा डोंगर पहाट जागी होण्यापूर्वी झोपी जाणार होता. भोवतालची शांतता पक्षांच्या किलबिलाटाने भंगणार होती. अंगात त्राण राहावा म्हणून संध्याने आठवणींना गिळले. पिवळ्या सूर्यफुलावर सकाळचे दहिवर पडावे, तसा तिच्या तोंडावर घाम डवरला होता. तिचा देह कात टाकलेल्या नागिणीसारखा पिवळाजर्द दिसत होता. रात्रभरची झोप सुधरत नव्हती.

''मनातले काय ते एकदाचे सांगून टाकावे आणि आपल्या छातीवरचा भार मोकळा करावा'', असे तिला आता वाटू लागले होते. दमलेल्या मनातून खंगलेल्या संध्याने साजनला आज कोणत्याही स्थितीत प्रत्यक्ष भेटण्याचे ठरवले होते. 'रविवार असल्याने साजन नक्कीच भेटणार', अशी तिला अपेक्षा होती. स्वत:वर संताप काढत तिने सकाळचा दैनंदिन सोपस्कार आवरला. घरकाम करणाऱ्या सयाला मैत्रिणीकडे जात असल्याचे सांगितले. आणि ती घराबाहेर पडली. धाडस करून संध्या थेट साजनच्या वसतिगृहापर्यंत पोहचली. साजन रजनीकपड्यात गच्चीत दात घासत उभा होता. वसतिगृहाबाहेर स्कुटी लावून संध्या फाटक उघडून आत येतानाची चाहूल लागली. तो घाबरला, कावराबावरा झाला, ''आपण दिवास्वप्न बघत आहोत की काय?'', असा अचंबित करणारा सवाल त्याला क्षणार्धात पडला. मित्रांना मागमूस न लागू देता घाईगडबडीने जिना उतरत तो फाटकाकडे निघाला. भांबावलेल्या संध्याला त्याने लगबगीने वसतिगृहाच्या आवाराबाहेर नेले. गेल्या काही दिवसांपासून मनाला सतावणाऱ्या भावना मोकळे करताना ती एकदाची साजनला बोलून गेली.

''मी घर सोडून आले साजन तुझ्यासाठी.''

''काय...?'' साजनने विस्मयकारक सवाल केला.

त्यावर संध्या निर्धास्त उत्तरली, ''घरच्यांना न सांगता.''

''संध्या...'' बोलणे उर्धवट ठेऊन.

''पळून जाऊन लग्न करून आली नाही म्हणणार... बघ, माझ्या उदरातली

आपली खूण आजी–आजोबा करत राहील, तोपर्यंत घरचे सारा राग विसरून गेलेले असतील.''

साजनच्या छातीत धस्स झाले! त्याने कोंडलेला श्वास सोडला. त्याला जणू सकाळी–सकाळी रात्रीचे तारे दिसू लागले.

''भीती नाही वाटत तुला स्वप्ने बघताना? कारण, तुला असे स्वप्नात रमलेले बघताना संध्या मला खूप काळजी वाटते तुझी.''

''तुला माझी काळजी वाटते ना... म्हणूनच मला भीती नाही वाटत...''

साजन गोंधळलेल्या विचारात पडला. संध्याच्या मनातल्या खदखदणाऱ्या भावना स्पष्टपणे तिच्या चेहऱ्यावर उमटून दिसत होत्या.

''काय झाले साजन, कसला विचार करतोय्?''

''विचार करतोय् की तुला कसे सांगू? कसे सांगू मी तुझ्या चित्रातल्या, स्वप्नातल्या घरांना नाव जरी माझे असले तरी... त्यात मला मी कुठेच दिसत नाही गं. एक सांगू? त्या दिवशी आपण जे काही केले ते तू भूतकाळातली चूक समजून विसरून जा.''

संध्या कावरीबावरी होऊन संतापाने फणफणली...

''विसरून जाऊ? मीच फिदा झाली होती तुझ्यावर, हीच माझी मोठी चूक झाली होती ना? कशी विसरून जाऊ? ती काही माझी एकटीची चूक होती? साजन त्यात तुझाही सहभाग आहे... तूही भागीदार आहे. तुझ्या पुढाकाराने, मर्जीने आणि माझ्या संमतीने आपण दोघांनी निर्णय घेतला होता तो. त्यास चूक अजिबात म्हणता येणार नाही, विसरण्याचा प्रश्न मग येतो कुठून? मला कळत नव्हते असे नाही रे. सगळे कळत होते. मात्र, मीदेखील मला तेव्हा अडवू शकली नव्हती. कारण, कधीतरी तू माझा होशील, असेच वाटले होते मला.''

संध्याच्या सवालांच्या सरबत्तीवर मलमपट्टी करताना साजन थोडासा भावनिक झाला, ''संध्या, नको! नको रमवू स्वत:ला इतकी स्वप्नांच्या दुनियेत. मला माहिती आहे मी तुझ्यासाठी तुझे सर्वस्व आहे. जिंदगी व्यापून टाकली आहे ना तुझी अगदी आभाळासारखी? या आसमंताखाली प्रारंभी खूप छान वाटते, मोकळे वाटते, प्रसन्न वाटते. पण, त्यात कोणी आपला निवारा नाही गं शोधत संध्या. त्यासाठी घर हवे असते, मायेची ऊब लागते आणि मी तुझे घर नाही गं! सुरूवातीला खूप छान, मोकळे, प्रसन्न वाटणारे हे आभाळ नंतर भकास आणि एकटेपणाची जाणिव करून देते संध्या. आणि, आणि संध्या तुझ्याबाबत मला असे नाही होऊ द्यायचे. आपले आयुष्य आहे ना संध्या; हे खूप सुंदर आहे, अगदी तुझ्यासारखे. माझ्यासाठी नको

वाया घालवूस गं. ऐकशील माझे?''

साजनच्या बोलण्यातून समाधान न झालेली संध्या अधिकच चिडली. तिच्या संतापाचा पारा चढ–उतारीच्या चाकोरीत अडकला. त्यामुळे आर्द्रतेचा पत्ताच नव्हता! न पटणारा साळसूद सल्ला देणाऱ्या साजनच्या बोलण्याची तिला कणव आली. ना–ना शंका तिच्या मनात घर करू लागल्या. किनारा गाठू पाहणारी तारुण्याची नौका सागराच्या मध्यभागी अडकली होती आणि त्याचवेळी भरोसा नसलेल्या चक्रीवादळाचा प्रचंड तडाखा बसला होता. वावटळाचा अंदाज न आल्याने नाव मार्गावरून हेलकावे खात होती. गेला तो भूतकाळ होता आणि वर्तमानात जगताना बिगरमोसमी पाऊस धुवाँधार कोसळत होता. भविष्यकाळ यायचा बाकी होता, पण अर्धवर्तमानातच भूतकाळातल्या त्या घटनेची वाताहत झाली होती. अंधाराशी मुकाबला करताना संध्याच्या विचारांपुढे स्तब्ध झालेल मन दात विचकत होते. एखाद्या हमरस्त्यावर वळसा घातलेल्या जहरील्या नागिणीने फणा उगारून फुत्कारावे, तसे जिंदगीच्या एका निराळ्या वळणावर 'होता, आहे आणि असेल'च्या फैसल्याने चक्काजाम झाला होता. संध्याला काही सूचेनासे झाले. घर बसवायचा इरादा तर जाऊच द्या. पण, साजन झालेली चूक कबूल करायलाही राजी नव्हता! खडतर चढावावर विशिष्ट निर्णयासाठी गाडा अडला होता. ती माघारी फिरली, नव्हे तिने माघार घेतली. चांदवा नसलेली रात आपल्याच तंद्रीत जगण्यात मश्गूल झाली. तिच्या उदरात वाढणाऱ्या गर्भाची फिकर होती. भविष्याचा निर्णय अधुरा होता. मनोरुग्णाची जशी अवस्था व्हावी, तशी ती अर्धवट जिंदगी गुजारत होती. उदरातला कोंभ चिरडून टाकण्याच्या साळसूद सल्ला देणाऱ्या साजनच्या बुद्धीवर संध्याची दया आली. मात्र, ती आता कुणाकडे न्याय मागणार होती? वाटले, वासनापूर्तीसाठी साजनने उपभोग घेतला असावा. खोटारड्या प्रेमाचा रोल अदा करण्यात कदाचित तो माहीर असावा.

संध्या परिवारातली एकुलती एक लाडकी होती. तिच्या धाकट्या भावंडांचं जन्मातच दुनिया सोडून जाणे झाले होते. ''आता मी काय करू?'' सुकाणू नसलेल्या नौकेप्रमाणे तिची जीवननौका कुठेतरी भल्यामोठ्या खडकावर आदळू पाहात होती. ती थरथरली... समाज? आई–वडिलांना काय सांगावे? तिला काही कळेनासे झाले! पण, दुसऱ्या क्षणी तिने स्वत:ला सावरले. समाजात जगण्यासाठी समोर एकच उपाय होता, वैद्य गाठणे... मात्र, उदरात उमलू पाहणाऱ्या अंकुराचा त्यात काय अपराध होता? सत्याची कास धरणारी संध्या डगमगणारी नव्हती. खऱ्याचे खोटे करणारी नव्हती. तिने अखेरचा निर्णय घेतला, ठाम निर्णय. काल साजनच्या आंतरजातीय विवाहाची बातमी वृत्तपत्रात छापून आली होती. कदाचित त्याचे बातमीने ती सकाळपासून

विचारतंद्रीत असावी. संध्याचे मन आर्त-किंकाळ्या फोडत होते. ती झुरत होती. जळत होती स्वत:च्या केलेल्या कृतीवर... तिला पश्चाताप होत होता. कारण, वेळ निघून गेला होता. तारूण्याच्या उंबरठ्यावर वयात आलेली चांदवा नसलेली रात कधीचीच ढळून गेली होती. अनामिक प्रेमाची निराशा जहरापेक्षाही असह्य झाली होती. एखाद्या वावटळात दोन होड्यांची योगायोगाने गाठ पडली होती. आणि वादळ शमल्यावर त्या होड्या परस्परांच्या भेटीगाठी विसरून छे! जाणून-बुजून आपापल्या निवासाच्या जागी थांबल्या होत्या. त्यापैकी एक होडी प्रीतिच्या मार्गावर पारिजातकाची पुष्पे पसरवून त्या मार्गावरील काट्याकुट्या पदोपदी रक्तबंबाळ करून घेत होती.

साजनच्या अखेरच्या भेटीतून घरी परतलेली संध्या आपल्या गहऱ्या तंद्रीतून अचानक जागी झाली. तेव्हा भास्कररायाची सप्तरंगी किरणे खिडकीच्या पारदर्शक काचेमधून आत डोकावू पाहात होती. तेव्हढ्यात तिच्या उदरातून कुठूनतरी आवाज ऐकू आला, ''आई''... तिला फारमोठा आधार वाटू लागला. निदान येऊ पाहणाऱ्या जीवासाठी आपण सर्वकाही विसरायला हवे! पण, पाटीवरची अक्षरे सहज पुसली जातात, पुन्हा लिहिली जातात; परंतु जिंदगी-जिंदगानीच्या पाटीवरची अक्षरे कायमची कोरली जातात. संध्याची दशा काहीशी तशीच झाली होती. संभ्रमातून आणि उन्मादातून निष्पन्नलेले एक जग हुरहुरीच्या तसेच अस्थिरतेच्या वादळात प्रवास करून वितळून जात होते. आणि त्यातून दुसरी दुनिया निर्मितीस येत होती. तीदेखील व्यवहाराच्या आणि स्थिरतेच्या वादळातून वाट चालणारी होती. तीसुद्धा अशीच कुठेतरी चांदवा नसलेल्या रातीकडे जाणार होती! त्यामधून काहीतरी पुसले जाणार होते आणि काहीतरी खोदले जाणार होते. दोन मनांचे मिलन कायमचे संपले होते. त्यातून दुसरीच कथा निर्माण होणार होती. तीही कागदावर लिहिली जाणार होती, आयुष्याच्या प्रत्येक पानांवर लिहिली जाणार होती... तिचे नावसुद्धा 'चांदवा नसलेली रात' असेच काहीसे राहणार होते.

♦♦

(सदरची कथा ही धुळे येथील 'आपला महाराष्ट्र' दैनिकाच्या 'बहर' साहित्य पुरवणीत ११ सप्टेंबर १९९३ रोजी प्रसिद्ध झाली असून, त्यात नव्याने पुनर्लेखन करून अंतिम स्वरूप देण्यात आले आहे. कारण, त्यावेळी मोबाइल, वॉटस्ॲप अगर फेसबुक नव्हे; पेजर होते, याची वाचकांना कल्पना असावी. या वृत्तपत्राचे संस्थापक स्व. भाई मदाने आहेत. सध्या हे दैनिक नियमित प्रकाशित होते. संपादक म्हणून श्री. हेमंत मदाने कार्यरत आहेत. तेच आता दैनिकाचे मालक आहेत.)

♦♦

# २. अर्ध्यावरती डाव मोडला!

विटांच्या गच्चीवर झाडाखाली असेच हातात एक गुलाबाचे इवले इवले फुल घेवून, रुबिना विनयच्या बाजूलाच बसली होती. पण, आज विनयला सोडून ती कायमचीच निघून गेली... तिच्या असंख्य ढगाळलेल्या आठवणी त्याच्या मनात अजूनही घर करुन रुतलेल्या आहेत. तो त्या कधी विसणार, ते त्याच्या मनालाच माहीत.

त्यावेळी रुबिनाचे अन् विनयचे प्रेम खूप रंगात आले होते. रुबिनाला विनयची आठवण होत नव्हती, असा एकही दिवस जात नव्हता. पण, रुबिनाच्या घरात या प्रकरणाचा थांगपत्ता नसल्याने एकमेकांना चोरुनचू भेटावे लागत होते. त्यांच्या प्रेमाला वसंतऋतूसारखा बहार आला होता. त्यात दोन महिने कसे गेले, हेही समजले नसावे. कॉलेजची 'फायनल परीक्षा' जवळ आल्याने त्यांनी भेटीगाठीवर अंकुश ठेवला होता. अन् एके दिवशी कुण्यातरी रुबिनाच्या ओळखी-पाळखी युवकाने तिला एक पत्र पाठविले ते पत्र वाचून ती खूप अवस्थ झाली. शेवटी विनयचा सल्ला घेण्यासाठी ती प्रथम पत्र लिहावयास बसली. त्यात तिने लिहले...

प्रिय विनू,

'मी दोन दिवसांपासून खूप अस्वस्थ आहे. खरंच विनू मला तुझ्या आधाराची अधिक गरज आहे. तसेच तुझा बहुमोल सल्लाही हवा आहे. परवाच संजयचे पत्र माझे हाती पडले. त्या पत्रात त्याने, तुझा सुखात ठेवीन, तुझ्या साऱ्या आशा-आकांक्षा पुऱ्या करीन, तुला कधीच कसलीही कमी पडू देणार नाही, असे बरेच काही लिहिले होते. पण, त्याचे पुढचे पत्र वाचून मात्र मला धक्काच बसला. त्याने लिहिने होते, ''तू

जर माझ्याबरोबर लग्नाला तयार झाली नाही, तर मी माझ्या जीवाला विळख्यात ओढेन.''

खरचं विनू, प्रेम कधी जबरदस्तीने मिळू शकते का? तो आत्महत्या करील ह्या भीतीने मी अगदी अस्वस्थ आहे. म्हणूनच मला तुझे मार्गदर्शन हवे आहे. मी तुझ्याविना दुसऱ्या कुणाचा विचारही करु शकत नाही. काचेला पारा लावला तरच त्याला आपण आरसा असे संबोधून त्यात आपली प्रतिमा दिसत नाही. म्हणून मला तुझी साथ हवी आहे. माझ्या भरकटलेल्या नावेला किनारा दाखविण्यासाठी तुझ्या रुपातील नावाड्याची अत्यंत गरज आहे. दाखवशील ना मला किनारा...?'

सदैव तुझीच,
रुबिना

दोन-चार दिवसाचा कालावधी भूर्रकन निघून गेला. विनयनलादेखील रुबिनाचे पत्र स्पर्शन गेले. त्या अवस्थेत विनयनेसुद्धा तिच्या पत्रातील सवालाचे निरसन करण्यासाठी पत्र लिहिले.

प्रिय रुबी,

'तुझे पत्र पर्वाच मिळाले. वाचून खूपच दु:ख झाले. खरंच गुलाबाला काटे असतात हे मला माहीत होते. पण, याचा कधी अनुभव मात्र घेतला नव्हता. तो संजयच्या रुपाने आपल्याच प्रेमात येईल, हे माझ्या स्वप्नातही कधी नव्हते. कदाचित माझ्यापेक्षाही त्यांचे तुझ्यावर अधिक प्रेम असेल. पण, मी गरीब तर संजय लखपती आहे. एव्हढा काय तो जमीन-आस्मानाचा खरा फरक आहे. तू त्याच्याशी लग्न केलेस तर खूप सुखात राहशील. मात्र, मला कल्पना आहे की, तू या मोहाला बळी पडणार नाही. कारण, कॉलेजमधील धनवान मुलांच्या मागणीलाही तू कधी भीक घातली नाहीस. मी खूप मागणी घातली, त्यावेळेस माझी सारी परिस्थिती पडताळूनदेखील तू माझ्या प्रेमाचा स्वीकार केलास. आज तू माझ्याकडे मोलाचा सल्ला मागते आहेस, पण रुबी तुझ्या सहवासात आपल्या भावी वैवाहिक जीवनाची मी खूप स्वप्ने जोपासली. तुझी प्रतिमा आणि प्रतिभा मी डोळ्यातच नाही तर ह्दयात कोरली आहे. तू माझ्या जीवनात आली आहे. तू, माझ्या जीवनात आली नाहीस तर मी एकटाच जीवनाचा प्रवास करीन म्हणून हे सर्व स्मरणात ठेऊन तूच काय ते तुझा निर्णय घे...'

सर्वस्वी तुझाच,
विनू

विनूचे पत्र रुबिनाच्या हातून वाचून झाले. ती अधिक विस्मयली गेली. या ताळेबंद प्रेमाच्या चाकोरीत त्रिकोणी चेहऱ्याचे बुचकळे तिच्यात भयाची भावना भारावून काढली. तिच्या मनात एक विचार डोकावून गेला, स्वातंत्र्य हे पर्वतापलिकडील क्षितिजासारखे असते. क्षितिजाला कोण पार करत नाही. फक्त त्या दिशेने माणूस वाटचाल करीत असतो. आयुष्यभर इतरांना स्वातंत्र्याच्या वाटेवर चालण्यास मदत केली तरच खऱ्या स्वातंत्र्याला किंमत आहे. रुबिना आता विचारतंद्रीच्या खोलदरीत कोसळली. एकतर विनयनेही खऱ्या अर्थाचा सल्ला दिला नव्हता, सरते शेवटी निर्णय तिच्या हातातच होता, ती काय करु शकणार?

साऱ्या विचारांना दूर सारुन ती मैत्रिणीच्या बोलण्यावरुन बाजारात निघून गेली. तिच्या मैत्रीणींना हा किस्सा सांगितला तर काहीतरी निराळेच घडू शकले असते. त्याकरिता तिने सारा मूळगाभा लाळेसमवेत पोटात गिळून घेतला. त्याच दिवशी नियतीनेही रुबिनावर क्रूरपणे झडप घातली. बाजारातून मैत्रिणींसमवेत घरी परतातना भरधाव येणाऱ्या लॉरीच्या पुढच्या चाकाखाली ती सापडली अन् तिने ह्या जगाचा निरोप घेतला.

अभानातून विनय खडबडून भानावर आला. रुबिनाच्या मेघाळलेल्या आठवणीतून त्याच्या मनाचाही अर्ध्यावरती डाव मोडला. विनू, संजय नि् रुबिना यांचाही अर्ध्यावरही डाव मोडला. प्रेमाच्या चाकोरीत त्रिकोणी चेहरे, फक्त दुकोणी उरले होते. सूर्य केव्हाच कलला होता, तोदेखील भूमातेला अखेरचा निरोप देत होता.

♦♦

(सदरची कथा ही धुळे येथील 'मुलूख मैदान' दैनिकाच्या 'रविवारच्या खिडकीतून' साहित्य पुरवणीत २० जानेवारी १९९० रोजी प्रसिद्ध झाली आहे. हे वृत्तपत्र सध्या नियमित प्रकाशित होत असून, संपादक म्हणून ज्येष्ठ पत्रकार श्री. अशोक जैन व कार्यकारी संपादकपदी श्री. पुखराज जैन कार्यरत आहेत.)

♦♦

# ३. तिसरीही पोरच झाली हो...!

गिमाळ्याचे दिवस असल्याने ऊन अगदी रणरणत होते. बस स्थानकावर गाड्यांची तुफान गर्दी होत होती. गाडी लागली की, प्रेतावर गिधाडे तुटून पडावीत तशी माणसे गाडीवर तुटून पडत होती. म्हातारे–म्हाताऱ्या, लेकुरवाळ्या बाया अन् अशी झुंबड करायची सवय मोडलेला प्रकाश काही अहोटीच्या लाटेजोगा मागेच रेटला जात होता. पण, एकदाचा कसाबसा, पुढच्या माणसांना भेटून–रेटून एका पायाद्वारे शरीराचा तोल सांभाळण्यापुरता तो तरंगला.

थोड्यावेळाने चालक आला अन् गाडी वेड्यासारखी थबकत–थबकत निघाली. ती हेलकावत होती अन् धापा टाकीत धावत होती. प्रत्येक सिट माणसांनी ठासून भरली होती. मधली वाट गर्दीने गुदमरून गेली होती. खिडक्या पदरा–साड्यांनी, केसाळ डोक्यांनी आक्रसलेल्या अवयवांनी निपल्या गेल्या होत्या. मुंग्यांनी भरलेला साप तडफडत सरपटतो तशी गाडी झोकांड्या खात जात होती. हा एका तोंडाचा मासोळा जरा थांबला की, आतली घाण बाहेर ओतली जाई अन् त्याहून अधिक आत भरली जायची. पावसझडीच्या दिवसात झिरपणे सुटून नदीतले पाणी स्वच्छतेत संथपणे वाहते, तशी घामाने शरीराची अवस्था झाली होती. कुणाच्या टकलावरचा घाम, कुणाच्या दाढीचे खुंट, एखादीच्या मानेवरील पावडरचे चिकट थर नजरेस भरत होते. स्वस्थ उभे राहिले तरीदेखील एकमेकांचे श्वास नि् वास नाकातोंडात शिरून शिसारी येई. बुबूळांसमोर नाकपुड्यांपुढे, रंध्रारंध्रापाशी मुर्दाड मनांची अन् किळसवाण्या शरीरांची अगणित माणसे येथे ठेसलली होती!

साडेचारच्या बसमधून दैनंदिन कामाच्या व्यापात मरगळलेली माणसे आपापल्या गावाकडे रवाना होत होती. घाणरेड्या रूमालाने कुणी स्त्रिया शेवटचा घाम पुसत

होत्या अन् खांद्यावरून फिसळणाऱ्या साड्या सावरीत होत्या. सुस्कारे सुटत होते; जांभया वाढत होत्या. आपापले घर लवकर यावे म्हणून दमलेले डोळे अधीरपणे प्रतीक्षा करीत होते.

अखेर बसस्थानक आल्यावर प्रकाश दरवाज्यातून उतरायचा प्रयत्न करू लागला. मागच्या गावच्या बसस्थानकापासून तो एका सीटशेजारी अवघडून उभा होता. सीटवरची एक अनोळखी युवती त्याच्याकडे पाहात होती. अन् त्याच्याजवळ सरकत होती. तिने जागादेखील देऊ केली होती. पण, सीटच्या पाठीचा आधार घेऊन तो तसाच उभा होता. त्याचा आधार घेऊन दुसरी एक नोकरी करणारी तरूणी उभी होती. समोर दुकानाचे सामान घेऊन ढब्बूजी बसला होता. अन् बाकीच्या दुहीबाजूंनी अनेक माणसे गर्दी करून होती. गर्दी विरघळत चालली होती. सरकत होती. अखेर प्रकाश बाहेर पडला.

सायंकाळच्या पडछाया तशा अपार लोंबकत चालल्या होत्या. दिवसभर वणवा देणारा भास्कररायही एकदाचा भूगर्भाकडे निघाला होता. प्रकाश घाईने आपले घर गाठण्याचा प्रयतक करीत होता. एकाबाजूने त्याला कुठलीतरी चिंता कुरतडून खात होती. आपल्या पतकीला हॉस्पिटलमध्ये दाखल करून सकाळपासून तो आताशी घरी परतत होता. घरची पाऊले त्याला जबरीने ओढत नेहमीच्या दिशेने घसरते नेत होते. गावात, घरात, गल्लोगल्ली सर्वत्र माणसांची एकत्र कुजबूज चालू होती. प्रकाशला तिसरीही पोरगीच झाली होती. तिसरीही पोरगीच झाली... तिसरीही पोरगी झाल्याने प्रकाश नाराज मनाने घर गाठले. माणसांच्या कुजबुजीमुळे त्याचे मन अधिकच बैचेन झाले होते. तो तसाच घरात शिरला. ओसरीत आई मान खाली घालून बसली होती, ती रडत होती. आईला रडताना पाहून त्याला नवल वाटले. एका स्त्रीलाच स्त्री जन्म नको होता. तरी क्षणभर तिथे थांबून तो तडक खोलीत निघून गेला.

खोलीत अंधार होता. रातकिड्यांचा आवाज भयानक वाटत होता. त्याने दिवा लावला. सारी खोली प्रकाशाने उजळून निघाली. त्याचे लक्ष पलंगावर गेले. त्याच्या दोन्ही पोरी साखरझोपेत होत्या. त्यांचे केस विस्कटलेले होते. खेळताना तोंडाला लागलेली माती तशीच होती. कपडेही मातीने माखलेले होते. आईने त्यांना अंघोळ घातली नव्हती, हे त्यावरून दिसून येत होते. स्वत:च्या पोरींची त्याला दया आली. मात्र, त्याने आईला दोष दिला नाही.

त्याची पत्नी हेमलता तशीच होती. पहिली पोरगी झाली त्यावेळी घरातील सगळ्या सदस्यांपैकी तिच प्रचंड नाराज झाली होती. दुसरीही पोरगी झाल्यावर तर तिने पहिलीकडे लक्ष द्यायचे सोडून दिले. पहिल्या पोरीमुळेच पोरींची रांग लागली,

असे हेमलताला वाटत होते.

ह्या साऱ्या आठवणी प्रकाशला अस्वस्थ करीत होत्या. हेमलताला दुसऱ्यांदा दिवस गेले त्यावेळी ती म्हणाली होती, ''या खेपेला तरी पोरगा होईल की नाही?'' प्रकाशलाही तसेच वाटत होते. पण, त्याने तिला धीर दिला होता, समजावले होते. सरत्या शेवटी घडायचे ते घडलेच. पहिल्या पोरगीनंतर दुसरी पोरगी झाली दुसरीनंतर आज तिसरी ही...

त्याला आईपेक्षा स्वत:च्या हेमलताचीच जास्त काळजी भासत होती. ती फार नाराज होणार नाही ना? कदाचित, निराशेमुळे आजारी तर पडणार नाही?? साखरझोपेतल्या आपल्या दोन्ही पोरींना त्याने व्यवस्थित झोपवले आणि स्वत:ला पलंगावर लवंडून दिले. सकाळपासून हेमलताला हॉस्पिटलमध्ये दाखल केल्यावर त्याच्या पोटात पाण्याचा थेंबही गेला नव्हता. त्याला आता फार भूक कुरतडत होती. पण, तो जेवणासाठी उठला नाही. कारण, त्याच्या शरीरात त्राण उरला नव्हता. आईने चूलसुद्धा पेटवली नसणार ह्याची त्याला खात्री होती.

त्याच्या डोक्यात विचार भणभणत होते. 'ह्यापुढे आपल्याला पोरगा होणार नाही...' असंख्य प्रश्न त्याच्या डोक्यात थैमान घालत होते. त्या प्रश्नांना उत्तरे शोधून तो मनातील वादळ शमविण्याचा प्रयत्न करीत होता. तिसरीही पोरगीच झाली म्हणून काय? त्या काय जीव नाही... मुली कर्तृत्ववान नसतात का? आजकाल मुले वृद्धापकाळात आई-बापांकडे लक्ष कुठे देतात? पोरगा असून म्हातारपणी पागलपणाच्या गप्पांत निराश होण्यापेक्षा मुळात पोरगा नसलेला बरा. पोरी आई-बापाला विसरत नाही... नानातऱ्हेने प्रकाश स्वत:चे समाधान करून घेत होता. अचानक त्याला स्वत:च्या आईची आठवण आली. तो उठला आणि ओसरीत गेला. आई दोन्ही मांड्यांमध्ये डोके खूपसून बसली होती. 'मी' म्हणत त्याने तिला उठवले. तिच्या पाठीवरुन हात फिरवत म्हटले, ''आई, तुला इतके नाराज व्हायला काय झाले?'' आईने निराश स्वरात प्रकाशला प्रतिसवाल केला, ''तुझ्या वंशाने काम होई रे पोरा?'' प्रकाशने आईला उत्तर दिले, ''आई, माझ्या तिन्ही पोरी माझा वंश पुढे चालवतील... अगं, रात्री आकाशात सूर्य नसला तरी चंद्राचा सौम्यसा का होईना, पण प्रकाश पडतोच ना...!''

प्रकाशच्या बोलण्याने आईचे समाधान झालेले दिसले नाही. त्याने आईला खोलीत झोपवले. तो आपल्या खोलीत येऊन दोन्ही पोरींना कुशीत घेत आडवा झाला. त्याचा डोळा लागणार तोच दारावर ट्कट्क झाली. त्याने उठून दार उघडले, दारात पांढऱ्या कपड्याची कुणीतरी मंडळी उभी होती. त्याला पाहून प्रकाश भांबावला.

त्या व्यक्तीने निरोप दिला, ''आपली पोरगी देवाघरी गेली...''

प्रकाश थरथरला, घाबरला! त्या भन्न वाटले!! तिच्या जन्माने आपण दु:खी झालो म्हणूनच देवाने तिला आल्यावाटे परती नेले. आपण असे तिसरीही पोरगी झाली म्हणून विचार नानातऱ्हेचे विचार करायला नको होते. आपल्याच आसवांच्या पुरात ती वाहून गेली... वाटेतच... घरी येण्यापूर्वीच! या बातमीने त्याचे शब्दच हरपले. त्याने हा निरोप आपल्या आईला खोलीत जाऊन दिला. त्या नवजात बालिकेचा गुलाबी चेहरा  तेवढा त्याच्या नजरेसमोर तरळून गेला. त्राण नसताना तो तडक हॉस्पिटलकडे निघाला. हेमलताने कापडात गुंडाळलेला गर्भाचा गोळा त्याने पाहिला. आपल्या पतकीला धीर देत तो सकाळी पुन्हा घराकडे निघाला.

♦♦

(सदरची कथा ही धुळे येथील 'आपला महाराष्ट्र' दैनिकाच्या 'बहर' साहित्य पुरवणीत १० मे १९९२ रोजी प्रसिद्ध झाली आहे. हे वृत्तपत्र सध्या नियमित प्रकाशित होत असून, संपादक म्हणून श्री. हेमंत मदाने कार्यरत आहेत.)

♦♦

# ४. एक निराळी कथा

आशा धापटेचे शिक्षण कॉलेजात नि् राहणीस्थान होस्टेलला होते. काहीशी टुकार, वायेबार स्वभावाची ती होती. तिच्या आवाजानुसार वर्गातल्या विद्यार्थ्यांना ऐकावे लागत असे. अन्यथा, तिच्या दुसऱ्या मैत्रिणींना लावून ती आपट-आदळ करीत असे. आशा धापटे अन् तिची जीवलग मैत्रिण चित्रा पुंडलिक यांची बोचरी-टोचरी बोलणी ऐकून रंजना मनातल्या मनात पार चिडली होती. मुलीच्या जातीला येऊन असले असभ्य बोलणे, तरुणांसारखे वागणे बरे नाही. पण, मनात कितीही राग असला तरी बोलता येत नव्हते. कारण, त्या दोघी आणि त्यांच्या काही मैत्रिणी याची सॉलेट गँग होती. लेडीज होस्टेलमध्ये राहायचे असेल तर आशाचे असभ्य म्हणणे ऐकावे लागत असे. विरोध केला अगर महिला वॉर्डनला सांगितले, तर पोरी एवढ्या छळता की होस्टेल सोडून जाणे ते जीवनाला परवडते, अशीच काहीशी स्थिती निर्माण झाली होती.

माधुरी नावाची एक रुपवान यौवना होस्टेलमध्ये राहात होती. सौदर्याने बड्या-बड्या अभिनेत्रींनादेखील मान खाली तुकवावी लागेल, अशी राहणी आणि देखणी होती. पुरती उंच, गोरीपान, तपकिरी रंगाचे डोळे, झकास केस. तिच्या रूपावर अनेकांची नजर लागून होती. हेवा करणाऱ्या मुली होस्टेलमध्ये तिचा पुरता हेवा करायच्या.

त्या माधुरीवर आशा धापटेची एकवार मर्जी ठरली. मग, तिचा छळ सुरु झाला. तिच्या समोर पांचट बोलणे, खोलीत नग्न चित्रांचा अल्बम आणून ठेवणे, ती झोपली असताना अंगावर पाणी ओतणे-झोपणे, कपडे इकडे तिकडे तुडविणे आदीप्रकारे तिचा जाच सुरू झाला. एकदा तर ती बाथरुमध्ये गेली असताना तिच्या खुर्चीच्या

बरोबर मध्यावर लाल शाई ओतली. साडी बदलून माधुरी केस विंचरण्यासाठी खुर्चीवर बसली नि् पातळाला लाल डाग पडला. तशाच घाईने ती कॉलेजात गेली साडीवरील लाल डाग पाहून कॉलेजमधील टारगट पोरांनी तिची थाटामाटात टिंगल उडवून तिला पार वैतागून सोडले. कधी–कधी तिच्या पदराला चावट चिठ्ठ्या लावल्या जायच्या. तिला न कळत तू माझ्यावर प्रेम करते, माझे तुझ्यावर खरोखर अपार प्रेम आहे... वगैरे मोठ्या अक्षरांत असलेल्या चिठ्ठ्या वाचून कॉलेजातली टवाळखोर तरुण तिची बदनामी करायचे. सॉलेट गँग आशा धापटेच्या मागे असल्यामुळे तिची गुंडगिरी लेडिज होस्टेलप्रमाणे कॉलेजमध्येही वाढली होती.

एकदा तर तिच्या पर्समध्ये तिने जिवंत बेडूक ठेवले होते. ती खरेदीला बाजारात गेली. खरेदी करुन तिने पैसे देण्यासाठी पर्स उघडली अन् चार–पाच जिवंत बेडकांनी तिच्या अंगावर उड्या मारल्या. आशा दुरूनच गंमत बघत होती. माधुरी मोठ्याने किंचाळली. लोक जमले, हसू लागले. दुकानदार घाबरला. थरथर कापत माधुरी खाली बसली व दुरुन गंमत बघणाऱ्या आशाने आपली मैत्रीण चित्राच्या हातावर टाळी दिली.

आशा माधुरीच्या मागे हात धुवून लागली होती. तिची परकर पळवून नेणे, तिच्या नावाने हरतऱ्हेच्या चिरकांड्या उडविणे, अकारण बदनामी करणे, तिच्या आई–वडिलांना भलते–सलते पत्रे लिहून पाठविणे. एक ना अनेक मार्गाने ती माधुरीला छळत होती. तिच्या तोंडाला तोंड लावून पुरूषी वासनेबद्दल चर्चा करत राहणे. स्वत:च्या अंगावरचे कपडे काढून माधुरीसमोर वेडेवाकडे चाळे करणे असले अशोभनीय प्रकारे आशाने माधुरीचा छळवाद चालविला होता.

जाच असह्य झाल्याने अखेर माधुरीने होस्टेलच्या महिला रेक्टरांकडे तक्रार मांडली. आशाला वॉर्निंग देण्यात आली, पण माधुरीला मात्र तिने आयुष्यातून जबरदस्त उठवले वॉर्निंग मिळाल्यावर काही दिवस होस्टलमध्ये शांतता होती. मात्र, एकदा काय झाले, माधुरी आपल्या खोलीत रात्री गाढ झोपेत असताना आशा आपल्या मैत्रिणींना घेऊन कारस्थानाच्या तयारीने शिरली. जबरदस्तीने तिला कपडे काढायला लावले. तिच्या अंगावर मंत्रिणींना खेळायला लावल्या. आशाने ना त्या अवस्थेत माधुरीचे कॅमेराद्वारे खचाखच फोटो घेतले. पहाटेपर्यंत त्या माधुरीला छळत राहिल्या. पहाटे तिला धमकावून आशा आपल्या मैत्रिणींसमवेत खोली बाहेर पडली. माधुरी या कृत्यामुळे ढसाढस रडत सुटली. ती त्या दिवशी पार खचून गेली.

तीन दिवसांनी माधुरीचे नग्न फोटो घेऊन आशा तिच्या रुममध्ये आली. आणि तिला दम भरला, ‘‘माधुरी डार्लिंग आजपासून तू माझ्या सांगण्यानुसार वागले

नाही, तर तुझे हे सुंदसे फोटो कॉलेजातल्या रिपोर्ट बोर्डावर लावीन...'' माधुरीने ते फोटो पाहून डोळे धपकन झपकारले. आता ती तिच्या सांगण्यानुसार वागू लागली. आशा रोज तिच्या शेजारी झोपू लागली. माधुरीशी अश्लील चाळे करण्यास तिने रोज सुरूवात केली.

रूपवान माधुरीमागे रोज कॉलेजमधील हिरोंचा घोळका असतो मात्र, आपणास कुणीच विचारत नाही, या द्वेषापोटी आशा आतल्या-आत जळफळत होती. तिने शेवटी माधुरीचे ते फोटो कॉलेजमधील टारगट पोरांना दाखवलेच. कॉलेजमध्ये यावरून प्रचंड खळबळ उडाली. प्रकरण प्रिन्सीपलपर्यंत पोहोचले अन् अखेर माधुरीला कॉलेजमधून काढून टाकण्यात आले. ह्या भंकासी वादळाला समजावे जिंदगी एक क्षणाची!

♦♦

(सदरची कथा ही धुळे येथील तत्कालिन 'लोकसमस्या' दैनिकात 'रंग-तरंग' सदरात २० मे १९९० रोजी प्रसिद्ध झाली आहे. या वृत्तपत्राचे प्रकाशन आता बंद पडले आहे.)

♦♦

# ५. ठेवलेला रिश्ता

काल संध्याकाळचीच ही गोष्ट आहे. घरात, छोटीखेरीज कुणीच चिटपाखरू चिवचिवत नव्हते! दिवसभर कावळ्यासारखी कोकावणारी घरामधील म्हातारी–कोताऱ्ही मंडळी नेहमीप्रमाणे–पाय मोकळे करायला घराबाहेर बाहेर पडली होती. नि् मी मात्र लिखाणात पागल झाल्यासारखा छे! लिखाणाने मला पागल केल्याप्रमाणे 'प्रेमाचे नाते' नावाची पाच–सहा महिन्यांपासून अपूर्णावस्थेत असलेली प्रीतिकथा पूर्ण करण्यात गर्क होतो. वाटले आज कुठल्याही परिस्थितीत पूर्ण करूनच जेवायला बसायचे... मग् रात्र का डोळ्यासमोरून तरळून जात नाही. पण, मध्येच धाकट्या छोटीचा आवाज ... 'दादा! ताट वाढतेय्; चला जेवायला... नंतर मला मैत्रिणीकडे जायचेय् नि् तिला सोबतीला घेऊन राख्या आणायला बाजारात जायचे आहेय्... वेळ होत चाललाय्!!' सारख्या सात–आठवेळा हाच कुत्र्याचा आकांत... मग रतीच्या कयेत मंत्रमुग्धीत झालेले अन् अखर कंटाळा येऊन विचलीत झाले! मी खवळून उठलो अन् थोड्याशा खोळचट–मार्मिक शब्दांत रागावलो, '...जात काही नाही फुकटी? उगाच कशाला दिमाखाला ताण देते गं! तुला जर इतकी घाईच असेल; तर मर ना तिकडे... सगळे घर डोक्यावर घेऊन ठेवली... रविवार आहे. समजत नाही कार्टी कुठली... तुझा बाप ठेविल–तुझ्याकरिता दुकान उघडं...? मी नंतर जेऊन घेईन... भावाची चिंता करणारी आली शहाणी!' मनास सहन न झालेला राग एका झटक्यात ओकून दिला. रागाच्या भरात नकळतपणे बडबडून... कागदावर भरभर सरणारी लेखणी–जशीच्या तशी ठेवली; तद्वतच बाजूच्या पेल्यातील पाणी घशाखाली उतरवले नि् खुर्चीला मागे सरकवत उरला–सुरला मनातील बनावटी राग टेबलावर हातठोकींच्या माध्यमाद्वारा क्षणार्धांत मोकळा केला. खुर्चीवरून उठण्यापूर्वी, रागाचे थोडे नाटक करून छोटी

धामधाम जिना उतरून बाहेर पडली. वाटले, 'उद्या रक्षाबंधन. आपण आज छोटीला काय बोलून दिले (?)-बरे नव्हे!' कायमचे असते, आतातरी कथा पुरींच करावी... परंतु 'माशी' कुठे शिंकली? मागच्या दरवाज्यावरची घंटी, 'ट्रिंग... ट्रिंग... ट्रिंग...' पुन्हा उपादी... दार उघडले, तर द्वाराबाहेर कुणीतरी अनोळखी व्यक्ती बगलेत पिशवी घेऊन उभी होती. मी विचारले, ''कोण हवंय्?...'' नरेश रावताला इथेच राहतात का?' घरातील पिल्लावळची कटकट संपताच, ही आणखी एक दुसरी विचारणेची पिल्लावळ सुरू... मनात संतापाची पाल चुकचूकली ही व्यक्तीही आपली काहीतरी समस्या घेऊनच आली असावी (!)' नाहीतर फुकट्यांना वेळ नसता येथे यायला. वाटले, 'बाहेर गेले असल्याचे सांगून एकदाची आपली मुक्तता करून घ्यावी नि् झटक्यात दार बंद करून द्यावे. पण, कारण न विचारता परत फिरविणे म्हणजे मूर्खपणाचे सोंग...! दरवाज्यावर चक्क इतक्या स्पष्ट शब्दानं 'नरेश रावताला' असे लिहिलेले असतानाही मुर्खासारखे 'इथेच राहतात का?', विचारायचे नेमके कारण तरी काय असावे (?) क्षण-दोन-क्षण् मी बुचकळ्यात पडलो. पण अखेर न राहून, 'आपण कुठून आलात?'... 'नागपूरहून...' चेहऱ्यावरचे भीतीचे सावट उतरवित ती व्यक्ती बोलली. 'नागपूरहून!' 'होय!' नुकतेच येताहे 'या, या... आत या... बसा की'.

'मी प्रा.सौ. अमला देशपांडे यांची स्टुडंटस्, प्रतिभा खंडागळे... एम.ए. सेकंड मराठी स्पेशल. ढमक्या कॉलनीत राहते... शिक्षण तमक्या कॉलेजात करते... अमक्याची मुलगी...' इतकी पोथी-पुराण सुनविण्याऐवजी काम आहे ते नेमके एका झटक्या सांगून निर्धास्त व्हायला नको!'

'काय काम काढले? स्वतःच्या परिचयाचा पोथी-पुराण न उघडण्यासाठी!'

'मॅडमांनी तुमच्यासाठी राख्या पाठविल्या आहेय्!! उद्या उशीर होईल म्हणून म्हणून जाता-जाता देते. बाजूच्या इसमाकडून माहिती काढली की, मॅडमचे भाऊ येथे राहतात म्हणून...' ''राख्या!'' बगलेतील पिशवीत हात खुपसवित खाकी लिफाफ्यात बंद असलेल्या राख्या न राहून लिफाफा अखेर फाडलाच. भावासाठींच्या पाठविलेल्या दोन राख्यांसमवेत चिठ्ठी. संदर्भ प्रत्येक वर्षाप्रमाणेच! तरीही मन समाधानी झाले.

आमचा विवाह होऊन दहा-अकरा वर्षे होण्यात आली होती; तरीही ती आम्हा दोन भावांना कधी विसरली नव्हती! प्रत्येकवर्षी वेळेवर राखी घरपोच. कधी पोस्टमन आणतो, तर कधी कुठली व्यक्ती, तर कधी स्वतः.'

'पोरकट असताना या दिवसांत दुकानांमध्ये राख्या दिसल्या रे! दिसल्या

की, रडून-रडून त्या घ्यायला लावणारी अन् स्वतःच्या हाताशी घड्याळ समजून हौसेने बांधणारी घरातील लाडकी अमू गेल्या जवळपास सतरा-अठरा वर्षांपासून भावांकडून नेहमीप्रमाणे रक्षेची अपेक्षा करत होती. रक्षाबंधनाचे नाते कायमचीच ठेवून होती. माझे मन काहीक्षण गतकाळ घिरट्या घालायला लागले तोच मी भानावर आलो.'

'अच्छा मी निघते...'

'इतक्या लवकर... चहा वगैरे ...'

'चहा काय सर; पुन्हा कधीतरी आल्यावर सहभोजनालाच बसू! अच्छा! सो-यू अगेन; गुड नाईट'.

'बरे! फार फार धन्यवाद! या, कधीतरी निदान मॅडमची आठवण करून हं!'

'ओ.के.' म्हणून पायऱ्या उतरून ती युवती लुप्त झाली. नि् डोळ्यांसमोर उभी राहिली फक्त अमूची आकृती... अन् तिने रक्षाबंधनाच्या नात्यासाठी पाठविलेल्या ओंजाळीत ठेवलेल्या सारख्याच आकाराच्या राख्या; त्याही दोन. रेशमी बंधनाने जखडलेल्या प्रेमाच्या संग्रहासाठी. जीवनात कधीतरी संकटात, दुःखात धाऊन यायला हवा म्हणून ठेवलेलाहा एक रिश्ता.

♦♦

(सदरची कथा ही धुळे येथील तत्कालिन 'अविरोध' दैनिकात 'झरोका' सदरात २ ऑगस्ट १९९१ रोजी प्रसिद्ध झाली आहे. हे वृत्तपत्र आता प्रकाशित होत नाही.)

♦♦

# ६. अशाच एका पावसराती

खरेतर त्याचे आणि तिचे कवडीचेही नाते नव्हते. मात्र, ती त्याच्या वसण्या-असण्याची एकमेव साक्षीदार होती. पाड्यापासून फर्लांगाच्या अंतरावर असलेल्या भग्नावस्थेतल्या झोपडीला वादळी वाऱ्याने झोडपून काढले होते. ती जणू अखेरचा श्वास घेत होती. वादळापूर्वी संध्याकाळी शांतता होती. त्यानंतर अचानक विजांचा कडकडाट-लखलखाट, वाऱ्याची ओबडधोबड सुळसुळाट आणि डोंगरदऱ्यांतून घोंगावत सुटलेल्या तुफानाने धारण कलेले अक्राळविक्राळ रूप! झाडाझुडूपांना मुरथडलेल्या राक्षसी आवाजाचा साक्षात्कार... अधिकच भयदायक, जणूकाही भयाचीच राजवट पसरलेली! पाऊणेक तासाने वादळ हळूहळू शमले. मात्र, विजा अधून-मधून चमकत होत्या. टपोऱ्या थेंबांची बरसात सुरू झाली. डोंगराच्या चढावावरील पायवाटलगतची सागवाडी पावसाच्या माऱ्याने सळसळून निघाली होती. पाण्याचा प्रवाह आडमार्गाच्या दगडगोट्यांना रेटू पाहत होता. नाले, दऱ्या खळाळून वाहायला प्रारंभ झाला होता. संततधार कोसळणारा बेधुंद पाऊस... थांबून-थांबून चमकणाऱ्या विजा! वातावरण आल्हाददायक होते, पण उंच सखल डोंगरावरच्या त्या अनामिक पाड्याची दशा तेव्हढी दयनीय जाणवू लागली होती. मध्यरात्रीपासून पावसाची झिमझिम जारी होती, ती थांबायला राजी नव्हती. रिपरिपत्या पावसात पाडा मात्र पुरता न्हाऊन निघाला होता. बदलत्या मोसमाला देव मानत बरसणाऱ्या पावसात तो निपचिप होता. निसर्गाच्या अनाकलनीय शक्तीवर त्याचा दृढविश्वास होता. त्या पाड्यावरील लोकांचे जगणे केवळ निसर्गावर विसंबून होते. कैक पिढ्यांपासून मुलभूत गरजांनी डोंगरावरचा पाडा कोसो दूर होता. नव्हे, त्या सुविधांची तिथे कधी आवश्यकता भासली नसेल. कारण, त्या काय असतात? याची पुसटशी कल्पनाही तिथे नसावी.

दळणवळणाची सोय नव्हती अगर विज्ञान-तंत्रज्ञानाशी त्या पाड्याचे सोयरसुतक नव्हते. दैनंदिन देवाण-घेवाण, व्यवहारसुद्धा इतरांपेक्षा विचित्रच! लोकवस्तीची संख्या मोजण्याइतकी असली तरी तिथले राहणीमान जमान्याशी मिळते-जुळते मुळीच नव्हते. जणूकाही वेगळीच दुनिया तिथे अस्तित्वात असल्याचे चित्र होते. सोसाट्याच्या वाऱ्याने झोडपून निघालेली झोपडी खंगली होती, ती उन्मळू पाहात होती. पाच-साडेपाच फुटांवर पळसागाच्या पानांनी तिचा माथा आच्छादला होता. चौथी बाजू उघडी. झोपडीत जमिनीवरील वाहते पाणी पलायन केलेले... वरून बरसणाऱ्या पावसझडीची अजून दुसरीच टपाटप गळती नशा. झोपडी पाण्याने उबडबलेली नि् कुठल्यातरी दुपारच्यावेळी सावलीला आलेल्या रानगुरांनी शेळ्यावासरांनी टाकलेल्या लेंड्या एकवटलेल्या पाण्याच्या डबक्यात वर तरंगलेल्या हेलकावे घेऊन मौजमजा करीत असलेल्या सर्वत्र उद्ध्वस्ततेची प्रेतवळ कळा. बाहेर पाच तासांपूर्वी वीज पडून होरपळलेले एक अंजनाचे झाड. समोर क्षितीजापावेतो पावसझडीत भिजलेली ओबडधोबड डोंगराची रांग. झोपडीतून निघालेली एक पुसकट पायवाट, ती डोंगरात कुठेतरी जाऊन हरवलेली अन् पावसझडीने लाजलेली रजनी... किती, कितीतरी भयानकतेची परिस्थिती. तसल्या अपरात्री ती कुठूनतरी त्या झोपडीसमोर येऊन उभी राहिली. चिखलात माखलेले अनवाणी पाय. पावसाने छिबछिबलेली आदिवासी पेहराव केलेली नाटी, तिही पावसाने अंगाला चिपकलेली छातीवरल्या स्तनांच्या गाठी तटतटलेल्या कमरेखालील जीर्ण नाटीचा तुकडा, ताठकळलेल्या पायांभोवती लपेटून अधिकच मळकटलेली. केस लांबसडक कमरेपर्यंत वाढलेले. डोके खोल अन् संबंध शरीर तंगडे असूनही हलके-फुलके झालेले! क्लांतपणे ती झोपडीत शिरली अन् कापसाच्या काड्या-कुड्यांनी विणलेल्या एका चांद्याला टेकत संतापलेल्या पावससरींना आडोसा देऊन उभी राहिली. डोंगरवाट चुकलेल्या एखाद्या प्राण्यासारखी... डोळे माळावर क्षितीजापार... डोळ्यातील नजर गहाळ झालेली... दोन चमकणारी खोल शून्ये!

ती खाली बसताच हातापायांची हाडे वाजली अन् पडक्या झोपडीला थोडासा आधार वाटू लागला. पावसाच्या सरी आता तशा संपत आल्या. पावससरी संपेपावेतो ती तशीच बसून राहिलेली, मनात अगणिक विचारांची आवते उठलेली. कुठले आपण? कुठे आलो?? कशासाठी ही अपरात्रीचा नि् पावसझडीतली भ्रमणयात्रा??? कशाकरिता नुसतीच ही वणवण? ही पायपीट?? ऐन उमेदीचे वय; शरीररही कुरूप नाही. धमन्यातील रक्त उकळू लागते तेव्हा, आता स्थिर बनत चाललेल्या त्या डोळ्यांमध्ये मधमाश्या संचारत होत्या. 'नि ज्या फुलावर त्या डंख करण्यासाठी पिंगा घालीत, ते फूल घायाळ होत होते. एकोणीशीतील... रंग सळसळत असतानाच ही वणवण मागे

लावून घेतली. भिरभिरणारे डोळे संथ करण्याचा प्रयत्न केला. चालता-चालता वाहत्या पाटाचे पाणी फोडणारे हे बेबंद पाय एका चाकोरीत आणले, अजून कितीक त्रास आपल्या वाट्याला आहे? किती समज घालायचा. आता राहिले तरी काय?? चिखलची चव मोकळ्या मस्ताकने अन् अनवाणी पावलांनी एकदमच चाखली मग तरीही कशासाठी हा ताप?? कशासाठी हा देहदंद्व? ज्या वयात सुखाचा मागोवा होण्याकरिता हा देह वापरात आणायचा, त्या वयात त्याच्यामागे क्लेश लावून घेण्यात काय मिळविले आपण?? कितीही कमविले तरी त्याची आपल्याविषयी करूणाच नसते!!! रात्रंदिवस घामाचे थेंब मातीत मिळवूनही नुसते दोन घास पुरेसे मिळत नाही. मिळाले तरीही त्या दोन घासाचे रूपांतर त्याचा नशेत उतरतात... मग काय करावे? किती भांडावे??... किती कष्ट उपसावे या शरीराने???'

अद्याप ती अगणित विचारांसोबत तशीच अन् तिथेच बसून राहिलेली. तोच झोपडीबाहेर कुणाची तरी चाहूल ऐकू आली. चिखलात कुठलीतरी पाऊले चुकचुकू लागली, तिने झुकती नजर वळविली अन् पाहिले... तो नकळतपणे झोपडीआत शिरण्याच्या प्रयत्नात होता. हातात भिजलेल्या गवताचा पुंजा. अंगावरील कपडे पावसाने अगदी छिबछिब झालेले नि् अंगात थरथरता. ती किंचित न हलता पाहात होती. तिच्या मनात भितीची पाल चुकचुकली. अलौकिकपणे त्याने तिच्याकडे पाहिले. दोघांची गहाळ झालेली नजर एकमेकांच्या डोळ्यातील बिंदूत सामावली. तेव्हा दोघेही अधिकच घाबरले. वाटले ओळखीचे असावे. तशात तो तिला समजावीत होता. पण, ती हातवाऱ्यावरून नकाराचा प्रतिसाद देत होती. खरेतर त्या तरूणीचे कोणीही आप्तस्वकीय नव्हते! आईपासून-सग्यासोयऱ्यांपर्यंतच्या सर्वांना ती निराधार होती, कायमची वंचित. त्यामागे कारणही तसे होते. सारे देवाघरी गेले होते. कायचमे! एका वर्षापूर्वी त्या युवकाबरोबर तिचे लग्न जमलेले... छे! माणसांनी विवाह जमवून दिलेला. नि् काही दिवसांपासून नवरा नेहमीप्रमाणे दाबून दारू ढोसून दिवसेंदिवस, रात्र-अपरात्री त्रास देतो म्हणून घरगुती भांडणावरून घरातून एकलकोंडी राहण्यास बाहेर पडलेली. तसल्या वातावरणात आज पावसाच्या तडाख्यात सापडून ती झोपडीत अडकलेली नि् योगायोगाने तिच्या शोधात तेथे आलेला तिचा तरूणबांड नवरा.

♦♦

(सदरची कथा ही धुळे येथील तत्कालिन 'अविरोध' दैनिकात 'झरोका' सदरात १९ जुलै १९९३ रोजी प्रसिद्ध झाली आहे. हे वृत्तपत्र आता प्रकाशित होत नाही.)

♦♦

# ७. निरपराधी

तसे पाहिले तर हीना अन् सीना या दोघी सख्ख्या बहिणी नव्हत्या, इतकाच काय तो फरक! नाहीतरी त्यांच्यामधील नाते म्हणजे एखाद्या रक्ताच्या नात्यालादेखील लाजविण्यासारखे होते. श्रीमंतीच्या ऐक्यात वाढलेली सीना, अन् गरीबीतही समाधानी असलेली हीना; दोघींच्याही जीवनातील ही तफावत त्यांच्या मैत्रिच्या आड आली नव्हती. अगदी भातुकलीच्या खेळापासून तारूण्यांच्या उंबरठ्यावर या मैत्रीत कधी खंड पडला नव्हता. जणूकाही 'एकाच नाण्याच्या दोन बाजू! एक मन नि् दोन शरीरे!!' परंतु, हीना आज बैचेन दिसत होती. लग्नाची वरात जसजशी निकट येत होती, तसतशी ती अस्वस्थ होत होती. 'वाजत गाजत सासरी जाणाऱ्या सीनाला क्षणभर आपल्या घरासमोर भेटावे, तिचे अभिनंदन करावे!' म्हणून ती घराबाहेर जात होती. अलौकिकपणे तिच्या मनातील एका विचाराने दंश केला. विचार जणू तिला सूचवित होता...

'हीना खरोखरच जर तुझे तिच्यावर प्रेम असेल अन् तिचे चांगले व्हावे... अशी जर तुझी मनिषा असेल, तर निदान आज तू तिच्यासमोर जाऊ नकोस! कारण, आज तिच्या आयुष्यातील सर्वात आनंदाचा दिवस... ज्या दिवसाची कोणतीही पोरगी मोठ्या आतुरतेने, आसुसेने प्रतीक्षा करीत असते. पण तू...'

अन् अचानक तिचे डोळे पाणावले, नि् तिची पाऊले अडखळली. तिने घराचा दरवाजा बंद केला. एव्हाना वरात पुढे निघून गेली होती. अर्धवट उघडलेल्या दरवाज्याच्या गवाक्षातून त्या पाठमोऱ्या वरातीला पाहात आठवणीच्या भोवऱ्यात ती खोल जाऊ लागली. अन् 'हे बघ माझी शेवटली पोरगी आहे नां (!)? ती मी तुझ्या घरी देणार आहे, नाही म्हणू नकोस!! परक्याची पोरगी घरात येण्यापेक्षा माझी पोरगी काही

वाईट नाही'...

'अगं,पण त्यासाठी पोराला नको का विचारायला? ते काही नाही, पोरगा तुझ्यापुढे जाणार नाही, याची मला खात्री आहे.'

आई-मावशी यांच्यामधील संवाद ऐकून अभ्यासाला बसलेल्या हीनाच्या मनात एकदम धस्स झाले! अभ्यासावरून तिचे लक्ष उडाले. अन् एक वेगळ्याच मंजुषाने तिला घेरले... म्हणजे!

'आता आपल्या लग्नाची तयारी चालली नाही! मी अजून लहान आहे!! अन् मला शिकायचेय्, पण आई पुढे तिचे काही चालले नाही. आईच्या मते शिकून जायचेच कुठे? अखेर चूल तर फुंकायची आहे नां?? तुझी आई नि् निमा कुठे शिकल्या होत्या??? मग काय चालवत नाही त्या आपला संसार! ताई किती सुखात आहे. तिच्या मातब्बर घरात काय कमी आहे!! ठाऊक आहे मला.'

'आता तिचा नवराच दारू प्यायला लागला, त्याला आम्हीतरी काय करणार? तरीदेखील... समजविण्याचा प्रयत्न करतो, तिचे चांगले व्हावे! म्हणूनच तर त्या मोठ्या घराण्यात दिले तिला. शिवाय, त्यांनीच मागणी घातले होते ताईला!

पण गंमत अशी की, धनवान घर बघून आईने ताईवर जबरदस्ती केली अन् तिला दारुवाल्या नवऱ्याच्या दावणीला बांधून मोकळी झाली. हा हीनाच्या मनातील विचारकल्लोळ तिला आठवायला वेळ लागला नाही. 'स्वतःची भूक लपविण्याकरिता तूही पळवाट शोधलीस. कारण, त्यावेळेस मी जरी लहान होते... तरी...'

'अगं दारू काय सगळेच पितात असे नाही. लग्न झाल्यानंतर सुधारेल तो. पायाशी चालत आलेले इतके मोठे घर... पुन्हा मिळणार नाही.' ह्या ताईला केलेल्या उपदेशाची आठवण आईला तिने करून दिली.

मात्र, आईला आता वेगळ्याच आजाराने अंथरूणावर खिळल्याने, तिची अखेरची इच्छा म्हणून नाईलाजास्तव ती या लग्नाला तयार झाली. कारण, शेवटी तिची भावी सासू दुसरी-तिसरी कुणी नव्हती, तर सख्खी मावशीच होती. त्यामुळे पुढेमागे तसा काही बावगप्रसंग उद्‌भवण्याचा सवालच नव्हता! परंतु, मावशीच्या घरी मात्र वेगळेच प्रकरण शिजत होते. कारण, सुशिक्षित आधुनिक विचारांशी सहमत असलेला जितेश मात्र अगोदरच कार्यालयामधील एका तरूणीशी वचनबद्ध झाला होता. अन् एक दिवस अद्‌भूत; आईने हीनाचा विषय त्याच्यासमोर मांडला. तेव्हा त्याने तो विषय झटकून टाकला. अखेरची घटका मोजत असलेल्या आपल्या बहिणीला दिलेल्या वचनाला जागण्यासाठी पुढे जितेशवर जबरदस्ती होऊ लागली. अन् एक दिवस,

'तुला हे लग्न करायचे नसेल तर दुसरी कोणतीही पोरगी आम्ही ह्या घरात घेणार नाही. नि् हक्काचा हिस्साही तुला मिळणार नाही! जा... काय... जसे वाट्टेल ते कर... आजपासून या घराचे कवाडे तुला बंद राहतील.'

स्वतःवर होत असलेल्या या अन्यायाला हीना सर्वस्वी जबाबदार आहे, असा मनीग्रह करून तिच्यावर सूड उगविण्याकरिताच जितेशने आपल्या आईला 'होकार' दिला. मग, वेगळ्याच नाहकाला त्याने सुरूवात केली. आता तो हीनाच्या घरी जाऊ लागला. तिच्यासमवेत फिरू लागला. हीनाला जितेशचा धूर्त-कावेबाज हेतू कळला नाही. लग्नही धुमधडाक्यात पार पडले. मात्र, गृहप्रवेशानंतर जेव्हा तिने आपल्या सुशोभित खोलीत प्रवेश केला, तेव्हा अवचित हृदयाचा थरकाप करणारे शब्द तिच्या कर्णपटलावर आदळले.

'हीना, आईच्या समाधानासाठी मी हे लग्न केले आहे. बाहेर समाजाला दाखविण्यासाठी तू माझी पत्नी असणार... पण, ह्या खोलीत मात्र तुला माझी बहीण म्हणूनच राहावे लागेल.'

हे शब्द ऐकताच स्वतःचा गेलेला तोल सावरण्याचा नि् जितेशला समजविण्याचा तिने अपयशी प्रयत्न केला. तरीसुद्धा तिला दूर ठेऊन कार्यालयामधल्या त्या प्रेयसीसोबत तो वेळ घालवू लागला. त्यामुळे अशा बऱ्याच गोष्टी हीनाच्या कानावर येऊ लागल्या, तरीदेखील ती त्याला समजावून, आपला हक्क मागू लागली. हीनाच्या सासूला हा साक्षात्कार पाहवला नाही. तिची आशाही जितेशला समजविण्यात फोल ठरली. शेवटी न राहून काही दिवसाकरिता तिने हीनाला माहेरी पाठविले. परंतु, कैक दिवस होऊनही घरचा निरोप येत नाही म्हणून... स्वतःहून सासरी गेलेल्या हीनाला मात्र आसवे गाळीत पुन्हा माहेरी परतावे लागले... ते आजपावेतो... आज हीनाचे हात आपल्या घरातून पाणावलेल्या डोळ्याने सीनाच्या वरातीला निरोप देत होते. एक... 'निरपराधी' अखेर 'अपराधी' जीवन जगत होती.

♦♦

(सदरची कथा ही धुळे येथील 'आपला महाराष्ट्र' दैनिकाच्या 'बहर' साहित्य पुरवणीत ५ जुलै १९९२ रोजी प्रसिद्ध झाली आहे. हे वृत्तपत्र सध्या नियमित प्रकाशित होत असून, संपादक म्हणून श्री. हेमंत मदाने कार्यरत आहेत.)

♦♦

# ८. पावसात भिजलेली संध्या

संध्या डोंगराच्या कडेकपारीवर मनासोबत नाचत होती, जणू तिला आज नाण्याचेच वेड लागले होते. पावसधारांनी भरलेल्या मनाच्या विहिरीत घुमणाऱ्या नानाविध आठवणींच्या पारण्यांमध्ये तिच्या विचारांचाच एक राजस नि् निळा पक्षी उठून दिसत होता... अन् त्यासरशी ती आपल्या नाचण्यात उल्हासित होत होती.

नाचताना थोडासा थकवा आल्यावर ती बाजूच्या एखाद्या झाडाखाली थांबत होती. झाडांच्या पानांवर ओथंबलेल्या अन् अलौकीकपणे टपकणाऱ्या थेंबासमवेत झोंबाझोंबी करत होती. कोवळ्या पावसप्रपाताखाली ओलिचिंब झालेली संध्या आपले लांबसडक केस उद्विग्त येथे-तेथे धावत होती... तिच्या अंगावर पिवळसर साडी असल्यामुळे एखाद्या पिवळ्या फुलासारखी तिची काया टवटवित दिसत होती. चिंब झालेली साडी अंगाला चिकटल्यामुळे तिच्या नसानसा दिसत होत्या. अंगाला चिपकलेल्या पिवळसर पण, हलक्या-फुलक्या पातळातून संध्याच्या देहाचा भरदारपणा अंगोपांग जाणवत होता... अन् बिनबाह्याच्या पिवळ्या ब्लाऊमधील तिचे उघडे दंड खरेच चुंबून घ्यावेसे वाटत होते. अपुऱ्या पाठीमागे टीचभर चोळीखाली उघडे पडलेले पिवळे अंग तरतरीत दिसत होते... तशी ती तरुणबांड भासवत होती. खरे तर हलक्या फुलाफुलाचे पिवळसर पण गहिरे पातळ तिने नेसले होते. दररोज ती या पेहरावाचत शोभत असायची. तिच्या नजरेत स्निग्धता होती, चेहरा प्रफुल्ल होता. साजशृंगार निराळ्या आदाकारीची होती. अन् नाचण्याच्या हालचालीत एक अनोखी चपळाई तिच्यात भरळत होती. ओटीपोटावर हळुवारपणे ती हात फिरवत होती नि् अलगदपणे आपल्या आनंदाला कुरवाळीत होती.

बाहेर, आभाळातून पावसाची बरसात सुरु होती. त्या काळ्याभोर भरलेल्या

आसमंताकडे पाहताच ती झोपेमधून जागी झाल्यावर नुकतीच वयात आली होती.

मागल्या पावसाच्या स्मृतींना गंध होता, गंधात अजूनही मोगऱ्याचा सुगंध होता. तोही सर्वत्र दरवळते होता. नि् सारी सृष्टी मृद्गंधाने न्हाऊन निघत होती. त्याचप्रसंगी ती वयात आल्यावर पावसासंगे झोंबाझोंबी करायला, पावसझडीत चिंबचिंब भिजायला बाहेर पडली होती. तिच्या अंगावर पावसधारा सांडल्या! तशाच तिच्या सैरसर केसांत पावसाचे थेंब घरंगळले. सर्वांगाला ताज्या पावसाचा शीतस्पर्श झाला. पावसासमवेतच तिला भोवताली दरवळलेला सुगंध जाणवला अन् तिने अकस्मात उल्हासित होऊन नाचायला सुरुवात केली होती. बिथरलेल्या पावसझडीत नाचण्याने तिचे मन हलके-फुलके नि् प्रफुल्ल होत होते. धरित्रीची हिरवाई अन् संध्या दोघेही त्या सुखपदरी पडणाऱ्या रिपरिपत्या पावसझडीत बेधुंद होऊन नाचत होते. मृद्गंधाने दोघांनाही भारुन टाकले होते, मोहवून टाकले होते. त्या शीतल सुगंधी गारठ्यात धरिणीने संध्याला भर पावसझडीत जवळ ओढून घेतले होते. अन् त्या निर्जन डोंगरांच्या कडेकपारीवर ऐन दिवसाढवळ्या संध्या पावसधारांच्या विळख्यात शिरली होती. पावसाच्या धारांतून घमघमणाऱ्या मृदगंधाला एक सप्तरंगी पिळसर रंग चढला होता.

संध्या लाजरी-बुजरी होऊन अचानक भानावर आली. अन् सागराला भरती यावी नि् लाटा बंधाऱ्याच्या भिंतीला आदळाव्यात तशी ती उल्हासित होऊन डोंगराला आच्छादेलेल्या हिर्वळाईवर धावत नाचू लागली. पावसझडीचे पैंजण जसजसे खणखणायला लागले. तसतसे रणझुणत्या पावसांत ती विचलीतपणे चालायला लागली. बराच वेळपर्यंत ती नाचत होती. आनंदाच्या डोहात न्हाऊन निघत होती. तिच्या पिवळ्या पातळातमधून पिवळसर अंग अगदी उजळून दिसत होते. सुडौल बांधा अधिकच उठावदार दिसत होता. जणू ती त्या भिजऱ्या पावसात रममाण झाली होती. पावसझडीत मिसळून गेली होती. तारुण्याच्या उंबरठ्यावर सौंदर्य जन्मास आलेली ती नवयौवना अवघ्या परिसराला आकर्षून घेत होती. परंतु, मध्येच माशी कुठे शिंकली अन् तशातच ती एकदाची रुसली अन् पुन्हा न नाचण्याचा निर्णय... ठाम निर्णय तिने घेतला.

डोंगरकपारीआड झालेली 'संध्या' (संध्याकाळ) अगदी अलौकिकपणे लुप्त झाली. बऱ्याच तासापासून पावसझडीत ओली चिंब व्हायला उतरलेली संध्यावती, आपले रुप न्याहळण्यासाठी... थिबथिबलेले कपडे, अंग अन् निरागस अंगावर सांडलेले जलबिंदू पुसण्याकरिता पावसझडीत भिजण्याची हौस पुरी करुन घरात शिरली अन् पावसाचा वेग जसा वाढला, तशी ती ढगाआड होऊन डोंगरापल्याडून पावसझडीला

निरोप देऊ लागली... तशी ती आजच्यापुरता निरोप देत होती... नि् नेहमीप्रमाणे हळूवार झोपी जात होती! हळूवार झोपी जात होती!!

♦♦

(सदरची कथा ही धुळे येथील 'आपला महाराष्ट्र दैनिकाच्या 'बहर' साहित्य पुरवणीत ६ नोव्हेंबर १९९३ रोजी प्रसिद्ध झाली आहे. हे वृत्तपत्र सध्या नियमित प्रकाशित होत असून, संपादक म्हणून श्री. हेमंत मदाने कार्यरत आहेत.)

♦♦

# ९. प्रेमातून स्पर्शाकडे

तो तिच्यापासून हलकेच दूर झाला. आपण तिच्यापासून दूर झालो आहेत, हे त्याच्या बराच वेळ ध्यानात आले नाही. अंथरूणावर डोळे मिटून आपण शून्यपणे पडलो आहेत, ह्याचीही त्याला दखल नव्हती. खालचे अंथरुण, भोवतालचा अंधार अक्राळ-विक्राळ रातकिड्यांचा किर्र आवाज... कशाचेच त्याला भान नव्हते. त्याचे शिणलेले शरीर ओंडक्यासारखे आडवे झाले होते. तृप्तीच्या कोशांत तो लपेटून गेला होता, पूर्णत्वाच्या पोकळीत पूर्णपणे तिवळून गेला होता.

कितीतरी वेळ तो तसाच शांत अभास होता. मग त्याला शुद्ध आली. एखाद्या जलदीपासारखे त्याचे हृदय जीवन प्रवाहावर हलकेच तरंगत आले. खोल पडसादांना परत सुमधूर स्वरांचा आधार मिळाला. काहीकाळ अस्तब्ध... तसाच तो सरल्या माणसांप्रमाणे पडला होता. घटकाभरात तो स्वप्नात धुंद निजला.

काल किती वर्षांनी अमला अकस्मात भेटली. कितीतरी दिवसांनी हृदय हेलावले, डोळे पाणावले, आशा-निराशेचध कढ आले नि् गेले त्या अधुऱ्या भेटीत तिचे आपल्यावरील प्रेम तसेच शाबूत आहे हे पाहून तो थक्क झाला. जुन्या जखमा, ओल्या भावना, साऱ्या परत जागृत झाल्या. हुरहूर, थरथर, प्रेमभंग, मानभंग, उन्माद, उपभोग, नव्या-जुन्या... आशा-आकांक्षा. नवे जग त्याच्या मनात नेमके असे काहीच ठरत नव्हते.

त्याच्या डोळ्यापुढे ती चपटी चावी चमकू लागली. क्षणभर तो पेटून निघाला. अमला केव्हा भेटते? असे त्याला झाले, पण दुसऱ्या क्षणाला तिच्याबद्दल आपण आभिलाषा धरावी, हे त्याला कसकसेच वाटले. खिशातला हात काढून त्याने केसांवरून फिरविला. छे! प्रेम काय पवित्र नव्हे? अमलासह एकांतात असताना दाखवलेल्या

संयमाचे, समंजसपणाचे अनेक प्रसंग त्याला स्मरले अन् पुन्हा अमलाची तीव्रतेने आठवण झाली.

दूरवर दिसणाऱ्या कित्येक पोरी त्याला अमलाच वाटल्या. पण, अमला आलेली नव्हती. तो अगदी अस्वस्थ झाला. बाजूने काही जोडपी जात होती. मात्र, अमलाच्या अन् त्याच्यासारखे भव्य प्रेम ह्या पिढीत कुठले असायला? आजूबाजूच्या इमारती त्याला घेरु लागल्या. अमलाशिवाय कसा वेळ काढायचा? हे कळेना. इतकी वर्षे तिच्याशिवाय कसे जगलो? हेही त्याला उमजेना. तिच्या सहवासातले सारे क्षण सारखे आठवू लागले अन् ते कालच्या भेटीत प्रकटलेले भाव, तिचे हास्य नि् अश्रू, शब्द, स्पर्श, दिव्य अन् अमर प्रीतिभावना त्याच्या डोळ्यांसमोर तरळू लरगले. मात्र, नुसती भावनाच आता उरली. बाकी सारे संकल्प संपले, छिन्नविछिन्न झाले. ती भावना अन् ती भेट दुसरी वा कदाचित शेवटची तरी. एकवेळ अमला भेटेल या अपेक्षेने त्याचे मन मन टकटकू लागले. एखाद्या नुसत्या प्रेमात पडलेल्या अगर प्रेम शाबूत असलेल्या तरुणासारखा विव्हळ झाला. तो एकदम हसला, कोवळेपणाचे सारे संबंध तत्काळ विसरला.

प्राणापलीकडे प्रेम करणारी त्याची प्रेयसी त्याच्या जवळ होती. पण, ही आता असून नसल्यासारखीच झाली. काय अर्थ होता तिला जागे करण्यात? ह्या पाच वर्षांत सारे जग बदलेले. पाच वर्षांपूर्वी जी स्वप्ने जोपासली, प्रतिशब्दाची माळ जपली ती सारी मोडून तोडून गेली. तितक्यात तो झोपेतून किंचाळत उठला. ती ओसाड पहाट अमलाला अन् त्याला प्रेमाच्या अथांग दरीत नेत होती... प्रेमातून स्पर्शाकडे!

♦♦

(सदरची लघुकथा ही धुळे येथील 'आपला महाराष्ट्र' दैनिकाच्या 'झेप' सदरात १४ डिसेंबर १९९३ रोजी प्रसिद्ध झाली आहे. हे वृत्तपत्र सध्या नियमित प्रकाशित होत असून, संपादक म्हणून श्री. हेमंत मदाने कार्यरत आहेत.)

♦♦

# १०. अरुणाचा करूण अंत...

तिचे अस्तित्व आपल्या ‘जगा’पासून केव्हाच वेगळे झाले होते. ४२ वर्षांपूर्वी जिवंतपणाच्या सगळ्या संवेदना हरवलेली अरुणा शानबाग सध्या पुन्हा चर्चेत आली असली, तरी त्या चर्चेचे वारे तिच्या आसपासदेखील पोचलेले नव्हते. ‘ती जिवंत आहे’, एवढेच केईएमचे वैद्यकीय अधिकारी सांगत. आता हे प्रकरण न्यायप्रविष्ट झाल्याने तिचे एकटेपण आणखी कडेकोट झाले होते. ‘केईएम’च्या कुठल्या तरी निर्जन कोपऱ्यातल्या ‘बेड’वर एकाकीपणे तिची देखभाल करणारे कर्मचारी आणि रुग्णालय प्रशासनाचे अतिवरिष्ठ अधिकारी वगळता, अन्य कुणालाच ती कुठे आहे हे माहीतदेखील नव्हते. अनेक परिचारिका आणि रुग्णालयाच्या वैद्यकीय महाविद्यालयात वैद्यकीयाचे धडे गिरविण्यासाठी शिकतानाच वेगवेगळ्या वॉर्डांमध्ये गळ्यात ‘स्टेथो’ अडकवून ‘ड्युटी’ करणाऱ्या अनेक नवख्या प्रशिक्षणार्थींना तर अरुणा शानबाग हे नाव आज पहिल्यांदाच माहीत झाले होते. तीन पिढ्या तिची चाकरी करून भागल्या होत्या.

नोव्हेंबर १९७३ मध्ये, म्हणजे तब्बल ४२ वर्षांपूर्वी सूडभावनेने पेटलेल्या सोहनलाल नावाच्या कुणा नरपशूने कुत्र्याच्या साखळीने तिचा गळा आवळून तिच्यावर पाशवी बलात्कार केला होता. तेव्हाच तिच्या मेंदूच्या संवेदना हरपल्या, तिची वाचा आणि दृष्टीदेखील हरवली. ४२ वर्षांपूर्वी सुरू झालेली अरुणाची ही ‘मरणकथा’ आज एका नव्या वळणावर येऊन थांबली होती. रुग्णालयातील तिच्या संवेदनाहीन अस्तित्वाचादेखील कधीकाळी तिथल्या परिचारिकांना मोठा दिलासा होता. कारण, अरुणावरील अत्याचारामुळे रात्रंदिवस कर्तव्य बजावणाऱ्या परिचारिकांच्या सुरक्षेचा आणि अधिकाराचा मुद्दा ऐरणीवर आला होता. अरुणा शानबाग हे परिचारिकांच्या

लढ्याचे प्रतीक बनले होते. अरुणा शुद्धीवर नव्हती, तिच्या संवेदना हरवल्या होत्या, हे माहीत असूनदेखील याच भावनेतून तिच्यावरील मायेपोटी तिच्यावर उपचार करणाऱ्या आणि तिच्याच 'बॅच'च्या परिचारिका आज बहुधा रुग्णालयाच्या सेवेत नव्हत्या. त्यामुळे, बेशुद्धावस्थेतही अरुणाने परिचारिकांच्या जगाशी जुळवलेले नाते आज संपून गेले होते. अरुणा ही रुग्णालयाच्या आणि तेथील कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने केवळ एक 'कथा'च राहिली होती.

सुमारे दहा–अकरा वर्षांपूर्वी अरुणाची 'स्टोरी' पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाली आणि प्रसारमाध्यमांची 'केईएम' परिसरात गर्दी सुरू झाली होती. पालिका प्रशासनाने तातडीने याची दखल घेतली आणि अरुणाचा वॉर्ड आणखीच एकाकी झाला होता. जगाच्या जिवंतपणाचे भानदेखील नसलेली अरुणा अधिक एकटी झाली होती. अरुणाच्या वॉर्डकडे फिरकण्यावर महापालिका आयुक्तांनी बंदी घातली होती, त्याला आता अनेक वर्षे झाली होती. अरुणाला जिथे ठेवले, तिथे जाण्याची सर्वसामान्यांना मुभा नव्हती. गेल्या ४२ वर्षांच्या काळात अरुणाच्या 'स्टोरी'चा गाभादेखील काहीसा पातळ झाला होता. तिच्या मायेचे, कुटुंबातले बहुधा कुणीच तिच्याकडे फारसे फिरकत नव्हते. तिच्या संवेदनाहीन शरीरात केवळ वैद्यकशास्त्रीय 'जिवंतपणा'... पण, 'जिवंतपणा' असलेल्या जगापासून ती दूरच...

इतकेच मला जाताना सरणावर कळले होते,
मरणाने केली सुटका जगण्याने छळले होते.
इतकेच मला जाताना सरणावर कळले होते,
याचेच रडू आले की जमले न मला रडणे ही
मी रंग तुझ्या स्वप्नाचे अश्रूत मिसळले होते.
इतकेच मला जाताना सरणावर कळले होते,
घर माझे शोधाया मी वाऱ्यावर वणवण केली,
जे दार खुले दिसले ते आधीच निखळले होते.
इतकेच मला जाताना सरणावर कळले होते,
मी एकटीच त्या रात्री आशेने तेवत होते,
मी विझले तेंव्हा सारे आकाश उजळले होते...''

**– सुरेश भट**

अशाच काही आशयाची मराठी गझलकार स्व. सुरेश भट यांची गझल. गावागावांत, शहराशहरांत अनेक तरुणी न केलेल्या गुन्ह्यांचे प्रायश्चित्त भोगत जिवंत

राहतात. केवळ पुल्लिंगी नाही म्हणून वासनेच्या यातनाघरांत फेकल्या गेलेल्या या तरुणी पाहिल्यावर एका अर्थाने त्यांच्या तुलनेत अरुणा सुखी वाटावी, अशी ही परिस्थिती होती. या चार दशकांत समाज कोणत्या दिशेने बदलला? त्याकडे पाहिले तर काही गंभीर प्रश्न पडतील!

सवाल अरुणा शानबाग यांचे निधन झाले म्हणजे काय? हा होता. पण, त्याहीपेक्षा अधिक १९७३ साली झालेल्या या अरुणा अत्याचारानंतर आपल्याकडे खरे तर काय बदलले हादेखील होता. सत्तरीच्या दशकानंतर २०१५ पर्यंत जग बरेच बदलले असे म्हटले जात होते. मात्र, अरुणा शानबाग यांचा मृत्यू हा या काळात भारतात काय बदलले नाही, हे दाखवतो. अरुणा शानबाग यांच्यावर अत्याचार झाला त्या वर्षी आजच्या तुलनेत जगणे बरेच सरळ आणि सोपे होते. इंटरनेटचा जन्म व्हायचा होता. सोव्हिएत फौजा अफगाणिस्तानात घुसण्यास सहा वर्षे होती. इंदिरा गांधींचे पंतप्रधानपद सुरक्षित होते. तेव्हा झालेल्या बांगलादेश युद्धातील विजयाने श्रीमती गांधींच्या शिरावर दुर्गापदाचा मुकुट चढवला गेला होता. केशवानंद भारती खटला आणि नंतरच्या न्यायालयीन लढ्यांमुळे या मुकुटास अद्याप तडा गेला नव्हता. राज्यकर्त्यांसाठी जनता जेवढी खाऊन-पिऊन सुखी असणे आवश्यक असते तेवढी होती. हा सुखी वर्ग तेव्हा प्रदर्शित झालेल्या बॉबी सिनेमामुळे घामाघूम होत होता. त्यावर जणू उतारा म्हणून अमिताभ बच्चन यांचा जंजीरदेखील तब्बल आठ महिने गर्दी खेचत होता. त्याच अमिताभशी लोकप्रियतेत स्पर्धा करणारा सचिन रमेश तेंडुलकर नुकताच कोठे जन्मला होता. तेव्हा चंगळवाद म्हणजे काय? हे माहीत होण्याआधीचा तो काळ. सर्वसाधारण मध्यमवर्गासदेखील रेशनवरून धान्य आणण्यात त्या वेळी कमीपणा वाटत नसे तो हा काळ. दादा कोंडके यांचा प्रदर्शित झालेला 'आंधळा मारतो डोळा' ही वाह्यातपणाची कमाल मानली जात होती तो हा काळ. वैद्यकीय श्रेष्ठ मंडळी या जमातीविषयी अत्यंत आदर व्यक्त केला जात असे तो हा काळ.

आपला पती वैद्यकीय वा इंजिनीअर असावा, असे प्रत्येक मध्यमवर्गीय तरुणीस वाटत असे तो काळही हाच. आणि असेच, वैद्यकीयांसह सुखाच्या संसाराचे स्वप्न रंगवणाऱ्या अरुणा शानबाग यांच्यावर अमानुष बलात्कार झाला तोही तोच काळ. अरुणा शानबाग या राजे एडवर्ड यांच्या स्मरणार्थ बांधण्यात आलेल्या मुंबईच्या केईएम रुग्णालयात परिचारका होत्या. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या खालोखाल आदर मिळवणारा पेशा त्यांचा. परंतु, त्याच रुग्णालयात साफसफाईची कामे करणाऱ्या कोणा सोहनलाल वाल्मीकी नामक इसमास या वैद्यकविश्वातील पावित्र्याचा गंधही

नव्हता. एका रात्री या वाल्मीकीचे वाल्यात रूपांतर झाले आणि वासनांध अवस्थेत त्याने अरुणावर बलात्कार केला. आपले हे कुकर्म अरुणाने बिनबोभाट सहन करावे, आरडाओरड करू नये यासाठी या वाल्मीकीने अरुणाला कुत्र्यांस बांधतात त्या साखळीने बांधले. जे झाले ते इतके अमानुष होते की विवाहाचे स्वप्न पाहणाऱ्या अरुणावर केवळ मानसिकच नव्हे तर शारीरिकदेखील आघात झाला होता. वासनांध वाल्मीकीच्या कृत्यामुळे अरुणाच्या मेंदूस मार लागला आणि त्या क्षणापासून एका रसरशीत आयुष्याचे रूपांतर कोणतीही भावभावना, संवेदना, जाणिवा नसलेल्या एका पालापाचोळ्याच्या जुडीत झाले. या मानवी पालापाचोळ्याची ही शुष्क जुडी केवळ श्वास घेत होती म्हणून ती जिवंत होती, असे म्हणायचे. ती जिवंत होती तिच्या सहकर्मचाऱ्यांसाठी. पण, तिच्या लेखी जग असे नव्हतेच. जगाने तिला निरोप दिला नव्हता. परंतु, तिने कधीच जगाचा निरोप घेतला होता. प्रश्न इतकाच होता, निरोपासाठी हाती दिला जाणारा हात कधी सुटणार हा. त्याचे उत्तर १८ मे २०१५ मिळाले होते. अरुणा शानबाग यांचे अधिकृत निधन झाले. आणि अरुणाचा अखेर करून अंत झाला. परंतु, मुद्दा असा की या काळात आपल्याकडे काय बदलले? बदल झाला तो इंदिरा गांधी यांचे निधन, बॉबी साकारणाऱ्या डिम्पलचे पिकत जाणे, वयाच्या सत्तरीतही कायम असलेली अमिताभची आसक्ती आणि सचिनची निवृत्ती, इतकाच? हे तर सर्व नसगकच. त्यात समाज म्हणून आपण काय केले? दिल्लीत याहीपेक्षा भयानक अवस्थेत एका तरुणीवर बलात्कार होऊ दिला, यास बदल म्हणावे काय? अरुणावर बलात्कार करणाऱ्याने कुत्र्याची साखळी वापरली. दिल्लीत तरुणीवर बलात्कार करणाऱ्याने पहारीचा वापर केला, हादेखील बदलच का? पण, ती दिल्लीतील तरुणी अरुणापेक्षा एका अर्थाने भाग्यवान. तिच्यावर अशी ४२ वर्षांच्या काळ्या पाण्याची वेळ आली नाही. ती लगेचच मेली हादेखील सकारात्मक बदल मानायला काय हरकत आहे? तिच्या मरणानंतरही तिच्या मरणास कारणीभूत असणाऱ्यांना तरुण म्हणावे की अज्ञ बालके हा सवाऐना पडलेला प्रश्न, हाच सामाजिक बदल अधोरेखित करतो. वास्तविक बलात्कार हा पूर्ण वाढलेल्या शारीरिक जाणिवांचा घृणास्पद आविष्कार. शरीराचे आणि त्यातील वासनांचे हे असे उकिरड्यासारखे वाढणे म्हणजे बाल्यावस्था संपल्याचे लक्षण. परंतु, तरीही असे कृत्य करणाऱ्यास तरुण मानण्याइतका आपला कायदा प्रौढ होऊ शकला नाही, हे बदलत्या समाजाचे लक्षण मानावे काय? तसे नसेल तर गावोगावच्या जिवंत अरुणांच्या वाढत्या कथा काय दर्शवतात? अरुणा पालापाचोळ्यासारखी का असेना ४२ वर्षे डोळ्यांपुढे राहाते. दिल्लीतील ती अभागी तरुणी काही आठवड्यांपुरती का असेना समाजपुरुष किती

नीच, हे दाखवत प्राण सोडते. पण, गावागावांत, शहराशहरांत अनेक तरुणी न केलेल्या गुन्ह्याचे प्रायश्चित्त भोगत जिवंत राहतात, यासदेखील आपल्या समाजातील बदल मानायचे काय? केवळ पुल्लिंगी नाही म्हणून वासनेच्या यातनाघरांत फेकल्या गेलेल्या या तरुणी पाहिल्यावर एका अर्थाने त्यांच्या तुलनेत अरुणा सुखी वाटावी, अशी ही परिस्थिती मानावी काय? याचे कारण निदान अरुणास बलात्कार कसा टाळावा, असा सल्ला देणारे कोणी बुवा-बापू सहन करावे लागले नाहीत.

बलात्कार घडला त्या वेळच्या तिच्या वस्त्रप्रावरणांची चर्चा करणारे कोणी भगवे वस्त्रांकित साधू वा साध्वी यांची बिनडोक बडबड अरुणास सहन करावी लागली नाही. 'सातच्या आत घरात' न गेल्यामुळे अरुणास बलात्कारास सामोरे जावे लागले होते, असे ऐकून घेण्याची वेळ तिच्यावर आली नाही. आताच्या तरुणींना वासनांधांच्या दोन पायांमधील नियंत्रणशून्य अवयवास जसे तोंड द्यावे लागते तसेच समाजातील अनेकांच्या दोन कानांमधील दडलेल्या मेंदूच्या विवेकहीनतेसदेखील सामोरे जावे लागते. अरुणावरील बलात्कारानंतर समाजात बदल झाला आहे, असे म्हटले जाते तो बदल बहुधा हाच. अरुणास विवाहाची स्वप्ने पडत होती. तीदेखील व्यर्थच. कारण, विवाहानंतरसुद्धा भारतीय नारीवर साक्षात पतीकडूनच होणारे असे अत्याचार सहन करण्याची वेळ येऊ शकते, हे अरुणास ठाऊक नसावे. आणि असे अत्याचार झाले तरी भारतीय विवाहितेस पतीकडून होणाऱ्या बलात्काराची तक्रार करण्याची सोय नाही, असे खुद्द सरकारच म्हणते हेदेखील अरुणास माहीत नसणार! भारतीय सांस्कृतिकतेत पतीकडून बलात्कार ही संकल्पनाच नाही म्हणे. सरकारच म्हणते, म्हणजे ते खरे मानायला हवे. अरुणावरील अत्याचारास चार दशके उलटल्यानंतर समाजात काय काय झाले त्याचे हे वर्णन. तेव्हा आपण सर्व अरुणा शानबाग यांचे ऋणी राहायला हवे. आपल्या सामाजिक प्रगतीची जाणीव तर त्यांनी आपल्या मरणाने आपल्याला करून दिलीच, पण त्याच बरोबरीने कोमात नेमके कोण आहे हेदेखील दाखवून दिले.

केईएम रुग्णालयात परिचारिका म्हणून कार्यरत असलेल्या अरुणाचे तेथेच कार्यरत एका वैद्यकीय अधिकाऱ्याशी सूत जुळले होते आणि ते दोघेही लग्नाचा विचार करत होते. मात्र काळाला काही वेगळेच अपेक्षित होते. १८ नोव्हेंबर १९७३ च्या रात्री एका घटनेने अरुणाची सर्व स्वप्ने विरून टाकली होती. रुग्णालयाच्या तळघरातील एका खोलीत कपडे बदलत असताना सोहनलाल वाल्मीकी नावाच्या एका कंत्राटी कामगाराने तिच्यावर हल्ला केला होता. तिच्यावर बळजबरी करत असताना सोहनलालने तिचा लोखंडी साखळीने गळा आवळण्याचाही प्रयत्न केला होता. त्यामुळे मेंदूला

प्राणवायूचा पुरवठा थांबला होता. शिवाय, मेंदूला पुरवठा करणाऱ्या पेशींना आणि मज्जारज्जूलाही गंभीर दुखापत होऊन तिच्या नजरेवर त्याचा परिणाम झाला होता. या सगळ्याचा एकूण परिणाम म्हणजे अरुणा कोमामध्ये गेली होती.

याप्रकरणी पोलिसांनी सोहनलालविरोधात बलात्कार वा विनयभंगाचा आरोप ठेवणे दूर, परंतु केवळ चोरीचा आणि हत्येचा प्रयतक केल्याचाच गुन्हा दाखल केला गेला होता. सोहनलालला पोलिसांनी अटक केली होती. त्याच्यावर चोरी आणि हत्येचा प्रयतक केल्याच्या आरोपाखाली खटलाही चालविला गेला होता. न्यायालयानेही त्याला चोरी आणि मारहाण केल्याप्रकरणी दोषी ठरवत सात वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली होती.

दुसरीकडे, या घटनेने संतप्त पडसाद म्हणून मुंबईतील परिचारिकांनी संप पुकारला होता आणि या संपाच्या माध्यमातून त्यांच्यासाठी कामाच्या ठिकाणी चांगली व्यवस्था उपलब्ध करण्याची जोरदार मागणी केली होती. पुढच्या काळात अरुणाला अन्यत्र हलविण्याचे पालिका प्रशासनाने प्रयत्न केला गेला होता. मात्र, त्या वेळेसही परिचारिकांनी आपल्या या मैत्रिणीसाठी पुन्हा एकदा आंदोलनाचे हत्यार उपसत पालिका प्रशासनाचा डाव हाणून पाडला होता. अखेर पालिका प्रशासनाला माघार घ्यावी लागली होती.

१९७३ पासून अरुणा कोमामध्येच होती, पण जिवंतपणी तिला भोगाव्या लागत असलेल्या मरणयातनेतून तिची सुटका व्हावी याकरिता तिला इच्छामरणाची परवानगी द्यावी, अशी मागणी अरुणाच्यावतीने तिची मैत्रीण व सामाजिक कार्यकर्ती पिंकी विराणी यांनी सर्वोच्च न्यायालयाकडे केली होती. तिचे शरीर कोणत्याही उपचाराला फारसा प्रतिसाद देत नसल्याने तिला इच्छामरण द्यावे, अशी मागणी विराणी यांनी याचिकेद्वारे केली होती. सर्वोच्च न्यायालयाने १७ डिसेंबर २०१० रोजी विराणी यांची याचिका दाखल करून घेत अरुणाच्या वैद्यकीय स्थितीचा अहवाल सादर करण्याचे आदेश केईएम रुग्णालय प्रशासन आणि राज्य शासनाला दिले होते. त्यानंतर अरुणाची नेमकी वैद्यकीय स्थिती जाणून घेण्यासाठी २४ जानेवारी २०११ रोजी सर्वोच्च न्यायालयाने तीन सदस्यीय वैद्यकीय अधिकाऱ्यांचे एक पथक स्थापन केले होते. या पथकाने अरुणाची वैद्यकीय पाहणी करून तिला तसेच ठेवण्याचा अहवाल सादर केला होता. त्या अहवालाच्या आधारे सर्वोच्च न्यायालयाने अरुणाच्यावतीने विराणी यांनी केलेली इच्छामरणाची याचिका फेटाळून लावली होती. कृत्रिम श्वसन यंत्रणेवर ठेवण्यात आलेल्या रुग्णाला इच्छामरणाचीही परवानगी देऊ शकत होते. मात्र, अरुणाची तेव्हाची स्थिती तशी नाव्हती. रुग्णालयाच्यावतीने

सादर करण्यात आलेले पुरावे व इतर बाबींची पडताळणी केली असताना तिला इच्छामरणाची मान्यता देता येणार नसल्याचेही न्यायालयाने प्रामुख्याने नमूद केले होते. शिवाय, रुग्णालय प्रशासनाकडून अरुणाची व्यवस्थित काळजी घेत असल्याचेही न्यायालयाने म्हटले होते. विशेष म्हणजे ही याचिका फेटाळण्यात आल्यानंतर एवढी वर्षे अरुणाची अविरत काळजी घेणाऱ्या केईएममधील परिचारिकांनी आनंदोत्सव साजरा केला होता. या ४२ वर्षांमध्ये या केईएमचा तो वॉर्ड हे अरुणाचे घर आणि तिची काळजी घेणाऱ्या परिचारिकाच तिचे कुटुंब बनले होते.

दरवर्षी १ जून रोजी अरुणाचा वाढदिवसही उत्साहाने साजरा होत होता. नोव्हेंबर २०११ मध्ये अरुणाला न्यूमोनिया झाला आणि तिची परिस्थिती खालावली होती. त्या वेळेस तिला चार दिवस अतिदक्षता विभागात ठेवण्यात आले होते. चार दिवसांनंतर तिच्या परिस्थितीत सुधारणा झाल्यावर तिला सर्वसाधारण वॉर्डमध्ये हलविण्यात आले होते. परंतु, खरे तर त्याच वेळेपासून अरुणाची प्रकृती खालावत गेली होती. तिची प्रकृती पुन्हा गंभीर होऊन तिला अतिदक्षता विभागात हलविण्यात आले होते. आणि गेल्या ४२ वर्षांपासून जिवंतपणीच भोगत असलेल्या तिच्या मरणयातनांना अखेर पूर्णविराम मिळाला होता. तिची त्यातून अखेर सुटका झाली होती. अरुणा शानबाग यांचे निधन झाल्यावर केईएममध्ये शोककळा पसरली होती.

दररोज हजारो रुग्णांचा प्रवेश होत असलेले केईएम नेहमीच गजबजलेले असते आजही होते. जुन्या इमारतीच्या तळमजल्यावरील वॉर्ड क्रमांक चार हादेखील त्यापैकीच. याच वॉर्डच्या एका बाजूला असलेल्या खोलीत अरुणा शानबाग सुमारे ४२ वर्षे होत्या. बाहेरच्या वर्दळीपासून वेगळ्या असलेल्या या खोलीत अरुणा यांच्या वेदनामय आयुष्याला परिचारिकांच्या सेवेची किनार लाभली. अरुणा यांच्यावर हल्ला झाला तेव्हा जन्मही न झालेल्या मुली आज केईएममध्ये परिचारिका म्हणून काम करत होत्या. अरुणा शानबाग यांच्यासोबत काम करणाऱ्या सहकारी परिचारिकांनी त्या काळात आंदोलन करून शानबाग यांना केईएममध्ये आणण्यास भाग पाडले. या सहकारी कालपरत्वे निवृत्त झाल्यावरही पुढील पिढ्यांतील परिचारिकांनी हे सेवाव्रत कायम ठेवले होते. त्यांच्यासाठी जुनी गाणी लावली जात होती. खोलीत अनोळखी व्यक्ती गेल्यावर त्या किंचाळत किंवा सुरुवातीला स्पजिंग करतानाही भीती वाटे. परिचारिकांच्या कुटुंबाचाच एक भाग झालेल्या अरुणा शानबाग यांच्या जाण्याने केईएममधील निव्वळ एक खोलीच रिकामी झालेली नव्हती तर परिचारिकांनी अनेक वर्षे ह्रदयात जपलेला हळवा कोपराही रिता झाला होता. अरुणा शानबाग यांची मृत्यूशी चाललेली वेदनामय झुंज अखेर संपली होती. तिच्यावर उपचार करणारे

काही वैद्यकीय अधिकारी तेव्हढे पुढच्या पिढीसाठी तिच्या मरणयातेची कादंबरी विज्ञान पुस्तकाद्वारे जिवंत ठेवण्याचा प्रयास करीत होते.

♦♦

('चांदवा नसलेली रात' हा कथासंग्रह समाप्त करताना सदरची लघुकथा ही २० मे २०१५ रोजी 'अरूणाचा करून अंत...' या नावाने लेखवजा माहितीस्वरूपात लिहण्यात आली आहे. या लघुकथेतील पात्र, घटना, स्थळ आणि नावे काल्पनिक असू शकतील, ही अभिलाषा. कारण, अरुणाचा करूण अंत झाला असला तरी पुढे तिची कादंबरी होऊन एखाद्या सिनेमाची निर्मिती होऊ शकते.)

♦♦

# लेखकाचा परिचय

नरेश रावताला नावाचे वादळ पत्रकारितेत अवघ्या खान्देशात घोंघावते आहे. कैक बड्या साखळी वृत्तपत्रांच्या दुनियेत वावरून ते आता धुळे येथील सांजदैनिक 'खान्देश मैदान'मध्ये कार्यकारी संपादक पदावर स्थिरावले आहेत. स्वत:चे 'बोंबाबोंब' नावाचे वृत्तपत्र असताना साहित्य लिखाणावर मग ते कोणत्याही स्वरूपाचे असो, त्यात रममाण झाले आहेत. पत्रकारितेच्या अठ्ठावीस वर्षांच्या कारकिर्दीत स्वत:ची फुशारकी न मारता खान्देशभूमीतल्या अहिराणीच्या 'दये तिले कये, फुकटी गोंडा घोये' या संज्ञेत विद्वान, विचारवंत, चिंतनशील लेखक अशी त्यांची पेहचान शाबूत आहे. 'म्हणाल त्याला कार्य' या चाकोरीत जिंदगी जगणारे आणि अहोरात्र विचारमग्न असणारे रावताला आपल्या कार्याला पुरून वर दशांगुळे उरले आहेत. 'जिंदगी का धुवाँ हवा में उडाता चला गया' हा त्यांचा बाणा राहिला आहे. मराठी भाषेवर प्रभुत्व असलेल्या रावताला यांच्या प्रतिभेचा, धुवाँधार लेखणीचा आजवर अनेकांनी वापर करून घेतला आणि त्या फुशारकीवर मोठमोठ्या गमजा मारत आहेत. झोपडीत राहणाऱ्यांनी महाल बांधले तर अनवाणी फिरणारे दिमाखात चार चाकीमधून हुंदडत आहेत. नरेश रावताला मात्र होते तिथेच आणि होते तसेच राहिले. याची खंत त्यांनी स्वत: कधी बाळगली नाही; पण त्यांच्या हितचिंतकांनी त्यांना त्याबाबत सतत डिवचले. अखेर त्यांनी स्वत:साठी, स्वत:च्या समाधानासाठी, समाजाच्या भल्यासाठी, दीन-दलितांच्या उत्थानासाठी लेखणी हातात घेतली आणि त्यांची लेखक म्हणून वाटचाल सुरू झाली. त्यांच्या ह्या उपक्रमाचे उत्स्फूर्त स्वागत होत आहे. नरेश रावताला काय चीज आहे हे यातून स्पष्ट झाले आहे. त्यांचे हे तर मध्यंतर आहे. त्यांच्या प्रतिभेचा बहर यापुढे दिसणार आहे. रावताला यांच्या लेखणीला पत्रकारितेची

किनार असल्यामुळे त्यांच्या लिखाणाला धार आली आहे. प्रतिभा मुळातच काठोकाठ भरलेल्या आडात असल्याने ती पोहऱ्यात येणे ओघानेच आले. वृत्तपत्रातील लिखाणाला मर्यादा असतात आणि ते स्थल-कालपरत्वे बदलणारे असते. पुस्तके, कादंबऱ्या, कविता, चरित्रे, आत्मचरित्रे, व्यक्तीचित्रे यातील लिखाण चिरकाल टिकणारे आणि कालबाह्य न होणारे असते. म्हणूनच रावताला यांनी ह्या ई-साहित्य माध्यमाची निवड केली आहे. याही माध्यमात ते आपल्या लिखाणाने झंझावात निर्माण करतील, अशी खात्री आहे. 'शुभास्ते पंथानः संतू' ह्याच त्यांना हार्दिक शुभेच्छा!

-मधुकर उपासनी
(ज्येष्ठ पत्रकार, धुळे)

♦♦